दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-४५ | रविवार, दि.८ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### हक्क असले तरी नैतिकता जरूर पाळावी

विद्यमान सरन्यायाधीश बी. आर. गवई, माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक यांनी निवृत्तीनंतर आम्ही लगेचच कोणतेही पद घेणार नाही अशी जी स्वत:हून पुढाकार घेत घोषणा केली आहे ती आदर्श मानायला हवी. सगळ्यांनीच याचे अनुकरण करावे असे बंधन कोणावर घालता येणार नाही. मात्र सगळ्यांनी तसे केले तर न्यायपालिकेवरचा विश्वास अधिक दृढ होईल आणि नैतीकतेला प्राधान्य मिळेल.

### छत्तीसगडमध्ये ७ नक्षलवाद्यांचा खात्मा

नवी दिल्ली : छत्तीसगडमधील बीजापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या जोरदार नक्षलविरोधी मोहिमेमध्ये गेल्या तीन दिवसांत किमान सात नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचे दोन महत्त्वाचे नेतेही ठार झाले असून, ही घटना राज्यासाठी आणि देशासाठी नक्षलवादविरोधी मोहिमेतील मोठा टप्पा मानली जात आहे. ही मोठी कारवाई बीजापूर जिल्ह्यातील घनदाट इंद्रावती नॅशनल पार्क क्षेत्रात झाली. या भागात सुरक्षा दलांनी ७ मृतदेह हस्तगत केले असून त्यामध्ये माओवादींच्या सेंट्रल कमिटीचा सदस्य नरसिंह चाळम ऊर्फ सुधाकर आणि तेलंगणा राज्य समितीचा विशेष विभाग सदस्य भास्कर ऊर्फ मईलारापू अडेल्लू यांचा समावेश आहे. सुधाकरवर ४० लाखांचे इनाम होते तर भास्करवर छत्तीसगड आणि तेलंगणा सरकारकडून मिळून ४५ लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

# ज्वारी खरेदी ठप्प झाल्याने शेतकरी अडचणीत

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात २९ मेपासून सुरू झालेल्या शासकीय ज्वारी खरेदी प्रक्रियेला सुरुवातीलाच मोठा तांत्रिक फटका बसला आहे. ऑनलाईन पोर्टलवर सातत्याने येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे आठ दिवसांत अत्यंत कमी ज्वारीची खरेदी झाली आहे.**



## सर्व्हर डाऊनमुळे शासकीय ज्वारी खरेदी होईना

पावसाळा तोंडावर असताना शेतकरी खरेदी केंद्रांवर रांगेत उभे राहण्याच्या चिंतेत आहेत. खरेदी-विक्री संघाद्वारे सुरू करण्यात आलेली ही प्रक्रिया शेतकऱ्यांच्या दृष्टीने पुरेशी प्रभावी ठरत नसल्याने नाराजीचा सूर आहे. खरेदी प्रक्रियेसाठी ई - पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे. मात्र, नोंदणी करताना सातत्याने सर्व्हर डाऊन, लोडिंग फेल अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. परिणामी शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत. काही वेळा खरेदीचे सत्र सुरू होताच तांत्रिक अडथळ्यामुळे संपूर्ण कामकाज बंद पडत आहे. दुसरीकडे काही ठिकाणी अद्याप शासनाकडून गोदाम सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळेही केंद्रे अजून सुरू होऊ शकलेली नाहीत. मान्सूनपूर्व पाऊस सुरू झाल्यामुळे अनेक शेतकरी पेरणीसाठी तयारी करत आहेत. अशा वेळी विक्रीसाठी केंद्रांवर तासन्तास रांगा लावणे, पैसे वेळेवर न मिळणे आणि त्यामुळे लागवडीत अडथळा येणे. या साऱ्या समस्या शेतकऱ्यांवर डोंगरासारख्या कोसळल्या आहेत.

## शपथपत्रासाठी स्टॅम्प पेपरची मागणी नियमबाह्य!

### नागरिक, विद्यार्थ्यांकडून स्टॅम्पपेपरची मागणी करू नका- बावनकुळे



मुंबई । प्रतिनिधी

शासकीय कार्यालयातील ई-सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी १०० अथवा ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची करण्यात येणारी मागणी नियमबाह्य असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिक, विद्यार्थ्यांकडून स्टॅम्पपेपरची मागणी करण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिली आहे.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी ◀◀ पान २ वर

# बिहार निवडणुकीतही मॅच फिक्सिंगचा महाराष्ट्र पॅटर्न

## राहुल गांधींनी सांगितली पाच टप्प्यात सुरु असलेली प्लानिंग

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**महाराष्ट्रात २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने मॅच फिक्सिंग करून विजय मिळवला. महाराष्ट्रातील मॅच फिक्सिंग नंतर आता बिहार विधानसभा निवडणुकीतही त्याची पुनरावृत्ती होईल. मात्र मॅच फिक्स्ड निवडणुका लोकशाहीसाठी विष आहेत, असा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर केला आहे. राहुल गांधींच्या या आरोपामुळे महाराष्ट्र आणि बिहारच्या राजकारणात पुन्हा खळबळ उडाली आहे.**

महाराष्ट्रात गेल्यावर्षी झालेल्या निवडणुकीनंतर ◀◀ पान २ वर



### मतमोजणीत घोटाळ्याचा आरोप हास्यास्पद-निवडणूक आयोग

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपच्या बाजूने मतदान प्रक्रिया रचल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. मात्र, निवडणूक आयोगाने त्यांच्या या आरोपांना ''अवास्तव व निराधार'' ठरवले असून, राहुल यांच्या मुद्यांचे खंडन करणारे निवेदन प्रसिद्धिस दिले आहे. राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला फायदा व्हावा यासाठी निवडणूक प्रक्रिया बिघडवण्यात आल्याचा आरोप केला. त्यांनी मतदार यादीत ७० लाख बनावट नावांची भर घालण्यात आल्याचाही आरोप केला. यावर निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, मतदारांचा निर्णय आपल्या विरोधात गेला म्हणून आयोगाच्या निष्पक्षतेवर संशय घेणे आणि बदनामी करणे हे पूर्णतः गैर व हास्यास्पद आहे.

### ५ महिन्यांत मतदारांची संख्या ४१ लाखांनी वाढली

याआधी देखील राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील निवडणूक निकालावर आरोप केला होता. ''महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ८.९८ कोटी मतदार होते, जे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ९.२९ कोटी झाले, म्हणजे पाच वर्षांत ३१ लाखांची वाढ झाली. मात्र, पुढील फक्त ५ महिन्यांत ही संख्या आणखी ४१ लाखांनी वाढून ९.७० कोटीवर पोहोचली,'' असा आरोप त्यांनी केला होता. त्यावर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिले होते. तरुणांच्या वाढत्या सहभागामुळे आणि नवमतदार नोंदणी मोहिमेमुळे मतदार संख्येत वाढ झाली. मतदार वाढवणे किंवा कमी करणे असे प्रकार झाले नाहीत, असे सांगत राहुल गांधी यांचे आरोप आयोगाने फेटाळले होते.

### या पद्धतीने सुरू आहे प्लानिंग

१) निवडणूक आयोगाची नियुक्ती करण्यासाठी पॅनेलची पुनर्रचना करणे. २) बनावट मतदारांची यादीत भर घालणे. ३) मतदारांची संख्या वाढवणे. ४) भाजपला जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या ठिकाणी बोगस मतदानाला लक्ष्य करणे. ५) पुरावे लपवणे.

## बिंदुसरा स्वच्छ झाली ; आ.संदीप क्षीरसागरांनी मानले अजितदादांचे आभार



बीड प्रतिनिधी

बीड शहराची जलधारा असलेली बिंदुसरा नदीला आवळला गेलेला अस्वच्छतेचा फास ना.अजितदादांनी सोडविला आणि तब्बल २५ वर्षांनंतर बिंदुसरा नदीने मोकळा श्वास घेतला. ना.अजितदादांनी तातडीने बिंदुसरा नदी स्वच्छतेच्या कामासाठी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. त्यामुळेच बिंदुसरा नदीची स्वच्छता करणे शक्य झाले आहे. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे बीड शहरात पुराचा धोका ◀◀ पान २ वर

### जिल्हाधिकारी आणि सर्वच सहभागी यंत्रणांचेही आभार- आ.संदीप क्षीरसागर

दि.२० मे रोजी बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सलग आजपर्यंत १७ दिवसांच्या स्वच्छता मोहीमेत मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक यंत्रणांनी सहभाग नोंदवला. नगरपालिका प्रशासन, महसूल प्रशासन, जायकवाडी पाटबंधारे विभाग यांच्यासह भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनीही स्वेच्छेने सहभाग घेतला होता. सर्वांच्या सहकार्यामुळेच बिंदुसरा नदीचे स्वच्छताकाम पूर्णत्वास जाऊ शकले. याबद्दल मा.जिल्हाधिकारी आणि बिंदुसरा नदीच्या स्वच्छता मोहीमेत सहभागी झालेल्या सर्व यंत्रणांचे आ.संदीप क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## राज-उद्धव एकत्र या ; शिंदेंची शिवसेना ही भाजपप्रणित

### शिंदे गटाच्या शिवसेनेचे नेते गजानन किर्तीकरांनी दिला घरचा आहेर



मुंबई । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना ही भाजपप्रणित असल्याचे धक्कादायक विधान माजी खासदार गजानन कीर्तिकर यांनी केले आहे. कीर्तिकरांनी पक्षावर उघडपणे नाराजी व्यक्त करत पक्षाला घरचा आहेर दिला आहे. त्यांच्या या विधानामुळे शिंदे सेनेतील अस्वस्थता समोर आली आहे.**

गजानन कीर्तिकर यांनी एका मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी म्हटले की, शिवसेनेच्या मतात विभाजन होते आणि शिवसेनेचे नुकसान होते. हे कोणीही सांगेल. सध्या जे आहे हे त्रिभाजन आहे. ◀◀ पान २ वर

## तुळजापूर, अक्कलकोट मंदिरात पंकजा मुंडे यांचे 'नो प्लास्टीक' अभियान

### मंदिर परिसरातील प्लास्टीक कचरा स्वत: उचलून नागरिकांना दिला संदेश

सोलापूर। प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज श्रीक्षेत्र तुळजापूर व अक्कलकोट मंदिरात आज 'नो प्लास्टीक' अभियान यशस्वीपणे राबवले मंदिर परिसरातील प्लास्टीकचा कचरा स्वत: उचलून त्यांनी नागरिकांना प्लास्टीकमुक्तीचा संदेश दिला. एकल प्लास्टीकचा पुनर्वापर रोखण्याचे आवाहनही त्यानी यावेळी केले.**



ना. पंकजाताई मुंडे आज श्रीक्षेत्र तुळजापूर, अक्कलकोट व गाणगापूर च्या दौर्यावर होत्या. दुपारी तुळजापूर येथे पोचल्यावर त्यांनी तुळजाभवानी मातेची खण नारळाने ओटी भरून दर्शन घेतले. भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, मंदिर समितीचे विश्वस्त यावेळी उपस्थित होते. देवीचे दर्शन झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी परिसरातील प्लास्टीकचा कचरा स्वतः उचलला, त्यांच्या या कृतीने उपस्थित भाविकांनी देखील पुढे येवून योगदान दिले. मंदिराच्या ◀◀ पान २ वर

## संत महंतांच्या आशीर्वादाने व्यासपीठ पूजन, ग्रंथदिंडी, मंगळ कलश स्थापन

# आज मराठवाड्यातील सर्वात मोठ्या प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस चाकरवाडी येथे होणार सुरुवात!

चाकरवाडी । प्रतिनिधी

**विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहाची सुरवात श्री माऊली दादाच्या समाधी पूजन, अभिषेकने शनिवारी सुरुवात करण्यात आली. यानंतर भव्य ग्रंथ**



दिंडीची विविध वाद्य सह मिरवणूक काढण्यात आली असून



मराठवाड्यातील सर्वात मोठ्या प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवपुराण कथेची आज पासून सुरुवात होणार आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने मुख्य कार्यक्रम व्यासपीठ पूजन करण्यात आले. यात मंगल कलश स्थापना, दीप प्रज्वलन, टाळ, मृदुंग, वीण, श्रुती पूजन, ध्वजारोहण, मुख्य संत महंतांच्या तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प. महादेव महाराज (तात्या) यांच्या हस्ते करण्यात आले. श्री ह.भ.प.नारायण महाराज भाऊ, शांतीब्रम्ह गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज, श्री क्षेत्र गोरखनाथ टेकडी, श्री ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री बंकटस्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर, श्री ह.भ.प.रामकृष्ण रधवे बापू ,श्री ह.भ.प.उद्धव बापू आपेगावकर, श्री ह.भ.प.पंडित महाराज गिरी , विश्वनाथ अप्पा स्वामी कपिलधर, श्री ह.भ.प.डॉ प्रशांत स्वामी, ज्ञानेबा माऊली महाराज श्री क्षेत्र बरड, श्री ह.भ.प.नाना महाराज कदम, श्री ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, दत्तात्रय मिसळ महाराज यांच्या हस्ते मुख्य व्यासपीठ पूजन ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.०० क्विंटल | २,२०० | २,६६१ | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड : १८२.५० क्विंटल | १,९०१ | २,८०१ | २,३८१ |
| मका/लोकल:२४.५०क्विंटल | २,०७५ | २,१९५ | २,१३५ |
| तूर : २०.५० क्विंटल | ६,४२१ | ६,४५० | ६,४४० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७५.०० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,३४० |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:५.५० क्विंटल | ४,१०० | ४,१०० | ४,१०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,३४६ | ५,३४६ | ५,३४६ |

## अग्रलेख

# हक्क असले तरी नैतिकता जरूर पाळावी

विद्यमान सरन्यायाधीश बी. आर. गवई, माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक यांनी निवृत्तीनंतर आम्ही लगेचच कोणतेही पद घेणार नाही अशी जी स्वत:हून पुढाकार घेत घोषणा केली आहे ती आदर्श मानायला हवी. सगळ्यांनीच याचे अनुकरण करावे असे बंधन कोणावर घालता येणार नाही. मात्र सगळ्यांनी तसे केले तर न्यायपालिकेवरचा विश्वास अधिक दृढ होईल आणि नैतीकतेला प्राधान्य मिळेल.

अलीकडच्या काळात अशा अनेक घटना घडल्या आहेत की न्यायाधीशांची निवृत्त झाल्यानंतर मोठ्या पदावर नियुक्ती केली गेली. काहींना संसदेवरही पाठवण्यात आले. मध्यंतरी एका न्यायाधीशांनी निवृत्त झाल्यानंतर लगेचच एका राजकीय पक्षात प्रवेश केला. या असल्या प्रकरणांमुळे न्यायपालिकेशी संबंधित व्यक्तींच्या आचरणाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहेत. यामुळे न्यायालयांवरचा सर्वसामान्यांचा विश्वास डळमळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सांगायचे कारण म्हणजे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनीच यासंदर्भात व्यक्त केलेली भूमिका. सरन्यायाधीश गवई यांनी ब्रिटनमध्ये भाष्य केले आहे. निवृत्तीनंतर न्यायाधीशांनी एखादे सरकारी पद स्वीकारणे अथवा निवडणुकीच्या रिंगणातच उतरणे याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. न्यायाधीश मंडळी जर अगोदरच भविष्यातील राजकीय लाभाचा किंवा सरकारी फायद्याचा विचार करत असतील तर न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना त्यांच्या निर्णयावर या बाबीचा प्रभाव नक्कीच पडू शकतो. पडतो किंवा नाही पडत हा नंतरचा भाग. किमान तसा समज निर्माण होण्याची अथवा आभास निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असेच गवई यांना सूचित करायचे आहे. जेव्हा अशा घटना घडतात तेव्हा त्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले जाणे स्वाभाविक ठरते आणि त्याची चर्चाही सुरू होते. एका व्यक्तीच्या कृतीमुळे संपूर्ण न्यायालयाची विश्वासार्हता यामुळे पणाला लागते कारण प्रत्येक कृतीचा अन्वयार्थ लावला जात असतो. राजकीय व्यवस्थेबाबत भारतात असंख्य मतप्रवाह आहेत. कोणाला यंत्रणा स्वच्छ वाटते किंवा त्यातील चांगले अथवा सकारात्मक काय आहे तेवढेच पाहावे आणि ते स्वीकारावे असा काहींचा कल असतो. तथापि, अशी विचारदृष्टी असणार्यांची संख्या अत्यंत नगण्य आहे. बहुतांश लोक राजकीय व्यवस्थेकडे नकारात्मक भावातूनच पाहत असतात. याउलट न्यायपालिकेकडे आदराने आणि विश्वासाने पाहिले जात असते. तिच्या स्वातंत्र्याबद्दल आणि निष्पक्षतेबद्दल शंका घेतली जात नाही. असे असल्यावर स्वत:ला कायम स्वच्छ आणि पारदर्शी ठेवण्याची जबाबदारी त्या यंत्रणेचीच असते. तसे न होता शंका निर्माण करणारी एखादी घटना घडली की त्यामुळे संपूर्ण यंत्रणाच वादाच्या भोवर्‍यात सापडते आणि तिच्यावरच्या विश्वासाला तडा जातो. न्यायाधीशांनी अशी निवृत्तीनंतरची नियुक्ती स्वीकारूच नये यासाठी वकिलांच्याच एका संघटनेने मागे एक याचिका दाखल केली होती. निवृत्तीनंतर न्यायाधीशांनी किमान दोन वर्ष कोणते सरकारी पद स्वीकारू नये असे बंधन असले पाहिजे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र ही बाब न्यायालयांच्या अधिकार क्षेत्रात येत नाही अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयानेच ती मागणी अमान्य केली. याचा अर्थ न्यायपालिका नियमांनुसार जर गेली तर ती असे प्रकार थांबवू शकत नाही. त्यामुळे येथे किती काळ थांबायचे आणि नंतर कोणती नियुक्ती स्वीकारायची किंवा नाही स्वीकारायची हा निर्णय ज्या त्या व्यक्तीच्या नैतिकतेवर आणि त्याच्या गरजेवर अवलंबून असतो.

न्यायाधिशांनी निवृत्तीनंतर काम केले पाहिजे अशी भूमिका मांडणारे अनेक आहेत. न्यायाधीशांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा राजकारणात अथवा त्यांची नियुक्ती झालेल्या अन्य पदाला फायदाच होईल असा तर्क त्यामागे असतो. तोही नाकारता येत नाही. त्याचे कारण आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत न्यायाधीशांनी विविध क्षेत्रांतील असंख्य प्रकरणे हाताळली असतात आणि त्यांचा निवाडा करण्यापूर्वी त्याचा सखोल अभ्यास व त्यावर चिंतनही केले असते. ही त्यांची ज्ञानाची शिदोरी केवळ ते निवृत्त झाले आहेत व त्यामुळे त्यांनी काम करणे संयुक्तिक ठरणार नाही या एका तर्काच्या आधारावर गरजूंना उपलब्ध होऊ शकत नाही.

प्रत्यक्षात आज स्थिती काय आहे ते दुर्लक्षून चालणार नाही. अपेक्षित नैतिक आचरणाला कधीच तिलांजली दिली गेली आहे. चुकीच्या बाबींचे कायद्याचाच आधार घेत समर्थन करण्याचाही शिष्टाचार रूढ झाला आहे. या पार्श्वभूमीवर विचार केला तर न्यायाधीशांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारत निवडणुकीच्या रिंगणात उतरणे अथवा निवृत्तीनंतर एखाद्या आयोगाचे अध्यक्षपद स्वीकारणे किंवा संसदेच्या वरिष्ठ सभागृहात जाऊन बसणे आदींचा पायंडाच जर पडला तर न्यायालयांनी भविष्यात केलेले कोणतेही निवाडे संशयापासून अलिप्त राहू शकणार नाहीत.

# आज पत्रकारांसाठी ‘वामा लढाई सन्मानाची’ चित्रपटाच्या शोचे आयोजन!




बीड । प्रतिनिधी

तेलगू हिंदी, अवधी, भोजपुरी अशा इतर चार भाषांमधील नऊ हिट चित्रपटांनंतर आपल्या भूमिपुत्राच्या मराठी सिनेसृष्टीतील पहिलाच मराठी चित्रपट लोकाशा ग्रुप मीडिया पार्टनर असलेला ‘वामा लढाई सन्मानाची’ संपूर्ण महाराष्ट्रात मागील ३ आठवड्यांपासून हाऊसफुल सुरू आहे.

बीडकरांनी देखील आपल्या भूमिपुत्राच्या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद दिला आहे. उद्या रविवार दि. ८ जून रोजी सकाळी ९ वाजता ’तनिष्का’ चित्रपटगृहात खास पत्रकारांसाठी प्रीमियर शो आयोजित करण्यात आला आहे. यावेळी या चित्रपटाचे मुख्य अभिनेता डॉ. महेश कुमार पत्रकारांसमवेत संवाद साधणार आहेत. तरी बीड शहरातील सर्व पत्रकार बांधवांनी या शो साठी उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्ह्याची भूमिपुत्र तथा वामा चित्रपटाचे प्रमुख अभिनेता डॉ. महेश कुमार आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे ( मो.नं.९३०९१ ७३०७७) यांनी केले आहे.

# एमपीडी कायद्याअंतर्गत दारुचा चोरटा व्यापार करणाऱ्या इसमाची हर्सल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन एमपीडी कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोनि पो.स्टे. संभाजीनगर परळी वै. यांनी दिनांक १२.०५.२०२५ रोजी इसम नामे रघुनाथ शिवाजी राठोड वय ६० वर्षे रा. धारावती तांडा ता. परळी जि.बीड याचे विरुद्ध एमपीडी कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुद्ध पोलीस ठाणे संभाजीनगर परळी येथे हातभट्टीची दारू जवळ बाळगणे, चोरटी विक्री करणे, अवैध दारुची वाहतुक करणे वगैरे स्वरुपाचे ०८ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सर्व गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. सदरील इसम हा हातभट्टीच्या दारुचा चोरटा व्यापार करीत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. सदर इसम हा पोलीसांची नजर चुकवुन हातभट्टीच्या दारुचा चोरटा व्यापार करीत होता. सदर इसमावर यापूर्वी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे ०२ वेळा प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा जोमाने हातभट्टीची दारू ताब्यात बाळगुन तिची चोरटी विक्री करण्याचे गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता. त्यामुळे पो.स्टे. संभाजीनगर हद्दीत व परळी शहरात व परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ०३.०६.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पोनि संभाजीनगर परळी वै. व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो. नि. स्थागुशा यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक ०७.०६.२०२५ रोजी ताब्यात घेऊन पो.स्टे. संभाजीनगर परळी येथे हजर केले. पो.नि. संभाजीनगर यांनी सदर इसमास दिनांक ०७.०६.२०२५ रोजी ०७.२९ वा. कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सुल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द करणे करीता रवाना केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्री. चेतना तिडके, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड, पो.नि. धनंजय ढोणे, पोउपनि अनिल शिंदे, पोह नरहरी नागरगोजे, मनोज घुगे, सर्व पो.स्टे. संभाजीनगर परळी वै. यांचेसह, पोउपनि सुशांत सुतळे, सपोउपनि अभिमन्यु औताडे, विष्णु सानप, सचिन आंधळे, मारुती कांबळे, अश्विन सुरवसे बिबीषण चव्हाण नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त एमपीडी कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री, नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

# संतोष घोडके अंबड पोलीस ठाण्याचे नवीन पोलीस निरीक्षक



अंबड । प्रतिनिधी

श्री संतोष घोडके हे अंबडला पोलीस उपनिरीक्षक म्हणून होते नंतर त्यांची बदली भोकरदन तालुक्यातील हसनाबाद पोलीस स्टेशन येथे झाली होती त्यांनी हसनाबाद पोलीस स्टेशन येथे चांगल्या रित्या पोलीस प्रशासनामध्ये सेवा बजली यानंतर श्री घोडके यांची बदली बीड येथे झाली होती तिथे पण त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून पोलीस प्रशासनामध्ये धडाकेबाज कारवाई केलेली आहे अशी त्यांची ओळख आहे. यानंतर श्री संतोष घोडके यांची पोलीस निरीक्षक म्हणून प्रमोशन झाल्यामुळे श्री घोडके यांना पोलीस निरीक्षक म्हणून पहिली पोस्टिंग अंबड पोलीस स्टेशन येथे देण्यात आले . श्री संतोष अप्पाराव घोडके पोलीस निरीक्षक यांनी शुक्रवारी ६ जून रोजी रात्री अंबड पोलीस ठाण्याचा पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारला. पोलीस निरीक्षक श्री घोडके येण्याच्या अगोदर सहायक पोलीस निरीक्षक अमोल गुरले यांच्याकडे एक महिन्यापासून अंबड पोलीस ठाण्याचा चार्ज देण्यात आली होती. त्यांनीही धडाकेबाज कारवाई करून पोलीस प्रशासनामध्ये एक वेगळी छाप निर्माण केली होती वाळु तस्करांसह मटका माफिया यांच्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात कारवाई केल्या होत्या. दरम्यान, जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल सुट्टीवर गेल्यानंतर आता ते हजर झाल्याने यांनी नवीन बदल केली. त्यांनी काढलेल्या आदेशानुसार अंबड ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी संतोष घोडके यांची नियुक्ती झाली आहे. श्री. घोडके यांच्यासमोर अंबड पोलीस ठाणे अंतर्गत सुरु असलेला मटका, आणि देशी-विदेशी दारुची अवैध विक्री, वाळु तस्करी, मुलींची छेडछाड, दुचाकी चोऱ्या, बस स्थानकातून पाकीट मार , दागिने व मोबाईल चोरी, अशा अनेक गुन्हेगारी कारवायांचा बंदोबस्त करण्याचं काम त्यांच्यासमोर मोठे आव्हान पोलीस निरीक्षक श्री घोडके हे गुन्हेगाराविरुद्ध धडाकेबाज कारवाई करतील अशी अपेक्षा व्यापारी व नागरिकाकडून करण्यात येत आहे.

# कोंबींग ऑपरेशन दरम्यान सराईत गुन्हेगार असलेला अट्टल दरोडेखोर अटक

गेवराई । प्रतिनिधी

**बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी अंमलदार यांना कोंबींग ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगार, फरार पाहीजे आरोपी यांना चेक करुन अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. त्याप्रमाणे पोलीस स्टेशन गेवराई परीसरात पोलीस पथकाने कोंबींग ऑपरेशन राबवुन पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलिंग सुरु केली होती.**

पेट्रोलिंगदरम्यान पोलीस पथकास गुप्त माहिती मिळाली की, नागझरी, ता-गेवराई, जि-बीड येथील पारधी वस्तीवर रेकॉर्डवरील गुन्हेगार असलेले दोन अट्टल दरोडेखोर वास्तव्य करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने गेवराई पोलीस स्टेशन येथील पथकाने दि.०७/०६/२०२५ चे ०२.०० वा. नागझरी येथील पारधी वस्तीवर कोंबींग ऑपरेशन राबविले असता नमुद दोन अट्टल दरोडेखोर असलेल्या आरोपींपैकी भगवान ईश्वर भोसले, वय-२१ वर्षे, रा-बेलगाव, ता-कर्जत, जि-अहिल्यानगर हा मिळुन आला व त्याचेसोबेत असलेला त्याचा सहकारी सराईत गुन्हेगार हा पारधी वस्तीच्या मागील अंधाराचा फायदा घेवुन पसार झाला. त्याचा काही



अंतरावर पाठलाग केला परंतु तो मिळुन आला नाही. मिळुन आलेल्या आरोपीविषयी अधिक माहिती घेतली असता त्याचेवर नगर तालुका पोलीस स्टेशन, कर्जत पोलीस स्टेशन जि-अहिल्यानगर येथे दरोडा व दरोड्याची पुर्वतयारी करणे या प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याला अधिक विचारपूस केली असता त्याने पोलीस स्टेशन करमाळा जि-सोलापुर हद्दीमध्ये गंभीर स्वरुपाची घरफोडी केल्याची कबुली दिल्याने त्याबाबत करमाळा पोलीस स्टेशन यांना माहिती दिली असता त्याचेवर गुरनं ४३८/२०२५ कलम ३३१(७),३(५) भारतीय न्याय संहिता अशाप्रकारचा गंभीर गुन्हा दाखल असल्याने सदर आरोपी भगवान ईश्वर भोसले, वय-२१ वर्षे, रा-बेलगाव, ता-कर्जत, जि-अहिल्यानगर यास पुढील तपासकामी करमाळा पोलीस स्टेशन जि-सोलापुर यांचे पथकाचे ताब्यात दिले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर सर, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मिना सर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, मपोउपनि/निशीगंधा खुळे, पोउपनि राम खोत, श्रीमंत उबाळे, सुरेश पारधी, पोह/अशोक हंबर्डे, चंद्रसेन माळी, मुकुंद रोकडे, जयराम उबे व होमगार्डस यांनी केली.

# कोण होणार भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष?

## पुढील आठवड्यात निवडीचे संकेत, तीन नावांची जोरदार चर्चा

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारतीय जनता पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. पक्षाने अद्याप कोणत्याही नावाची घोषणा केलेली नसली, तरी जूनच्या मध्यापर्यंत निवड प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती आहे. उत्तर प्रदेशात ७० नव्या जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीनंतर आता राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी हालचालींना वेग आला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामुळे ही प्रक्रिया काहीशी मंदावली होती.

पक्ष सूत्रांनुसार, राष्ट्रीय अध्यक्ष निवडीपूर्वी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये प्रदेशाध्यक्ष बदलले जाणार आहेत. उत्तर प्रदेशात जातीय समीकरणांना महत्त्व आहे. यापूर्वी ब्राह्मण चेहरा निवडला गेला होता, परंतु आता ओबीसी नेत्याची मागणी वाढल्याने बदलाची शक्यता आहे. मध्य प्रदेशात मुख्यमंत्री ओबीसी, तर प्रदेशाध्यक्ष ब्राह्मण आहेत. आता पक्ष आदिवासी नेत्याला संधी देण्याच्या विचारात आहे. उत्तराखंडातही ब्राह्मण नेत्याची चर्चा आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान (ओबीसी, ओडिशा), शिवराज सिंह चौहान (माजी मुख्यमंत्री, मध्य प्रदेश) आणि मनोहर लाल खट्टर (माजी मुख्यमंत्री, हरियाणा) यांची नावे चर्चेत आहेत. संघटनात्मक अनुभव, प्रादेशिक प्रतिनिधित्व आणि जातीय संतुलन असलेल्या नेत्याला प्राधान्य मिळेल. सध्याचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ लवकरच संपत आहे. त्यांना २०२४ च्या निवडणुकीसाठी मुदतवाढ मिळाली होती. आता पक्ष नव्या चेहऱ्याचा विचार करत आहे. निवड प्रक्रियेसाठी केंद्रीय निवडणूक समिती स्थापन होण्याची शक्यता आहे. काँग्रेस, आपसह विरोधी पक्ष बीजेपीच्या या निवडीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

पान १ वरून...

### बिहार निवडणुकीतही मॅच

विरोधी पक्षांनी सातत्याने निवडणूक हेराफेरीचे आरोप केले आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विधानसभा निवडणुकीवर पुन्हा टीका केली असून भाजपने विजय मिळवण्यासाठी मॅच-फिक्सिंग केल्याचा आरोप केला आहे. एक्सवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधींनी एका वृत्तपत्रात प्रकाशित झालेला त्यांचा लेख शेअर केला आहे. ‘‘महाराष्ट्रात झालेल्या विधानसभेच्या निवडणुका लोकशाहीत हेराफेरी करण्याची एक ब्लूप्रिंट होती. निवडणूक आयोगाची नियुक्ती करण्यासाठी पॅनेलमध्ये बदल करायचा. मतदार यादीत बनावट मतदारांचा समावेश करायचा आणि मतदारांची संख्या वाढवायची. भाजपला जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या ठिकाणी बोगस मतदानाला लक्ष्य करायचे आणि शेवटी पुरावे लपवायचे, असा दावा त्यांनी केला आहे. महाराष्ट्रात भाजप इतका हताश का होता, हे समजणे कठीण नाही. परंतु हेराफेरी ही मॅच फिक्सिंगसारखी आहे. फसवणूक करणारा पक्ष खेळ जिंकू शकतो, परंतु संस्थांना नुकसान पोहोचवतो आणि निकालावरील जनतेचा विश्वास उडतो. सर्व भारतीयांनी पुरावे पाहिले पाहिजेत. स्वतः निर्णय घ्या आणि उत्तरे मागा. कारण, महाराष्ट्रानंतर आता बिहारमध्ये मॅच फिक्सिंग सुरू आहे, असे आरोप राहुल गांधी यांनी भाजवर केले आहेत.

------------

### शपथपत्रासाठी स्टॅम्प

राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना पत्र पाठविले आहे. विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहेत. शासकीय कार्यालये प्रमाणपत्रांसाठी आणि न्यायालयात सादर होणाऱ्या शपथपत्रांसाठी आता स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही, असे त्यांनी या पत्रात स्पष्ट केले आहे. साध्या कागदावर स्वयं-प्रमाणित शपथपत्र सादर करणे पुरेसे आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना, विशेषत: ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्टॅम्प पेपरवरील खर्चातून मोठा दिलासा मिळत आहे.

**तर संबंधितांवर कारवाई करणार**

काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने स्टॅम्पपेपरची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी येत असल्याने बावनकुळे यांनी, कानाडोळा सोडा आणि जनतेला दिलासा द्या, अशा शब्दांत अधिकाऱ्यांना बजावले आहे. हा निर्णय सामान्य माणसाच्या हिताचा आहे. २००४ पासून ही सवलत लागू आहे. सरकारच्या वतीने वारंवार याबाबत सांगण्यात येत आहे, तरीही जिल्हा आणि तालुका प्रशासन याकडे दुर्लक्ष करणार असेल तर कारवाई केली जाईल. सर्वसामान्य जनतेला अकारण वेठीस धरणाऱ्यांना माफी नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

-------------

### तुळजापूर, अक्कलकोट मंदिरात

बाहेर असलेल्या दुकानांना भेटी देऊन त्यांना प्लास्टीक पिशव्यांचा वापर न करण्याचे आवाहन केले याशिवाय उपस्थित भाविकांना तसेच दुकानदारांना त्यांनी कापडी पिशव्यांचे वाटप केले. मंदिर समितीच्या वतीने कार्यालयात त्यांचा याप्रसंगी हृद्य सत्कार करण्यात आला. ना. पंकजाताईंनी अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ व गाणगापूर येथे श्री दत्तात्रयांचे दर्शन घेतले. याठिकाणी भाविकांना मार्गदर्शन करताना त्यांनी एकल प्लास्टीकचा पुनर्वापर रोखण्याचे आवाहन केले. प्लास्टीकची समस्या सध्या गंभीर बनली आहे, प्लास्टीक पिशव्या हया पर्यावरणाला अतिशय घातक आहेत, त्याचा वापर करू नये. प्लास्टीक ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा असं आवाहन त्यांनी केलं.

--------------

### राज-उद्धव एकत्र या ; शिंदेंची

दोन बंधू एकत्र आल्यावर त्यांचा तरी जनाधार त्यांना मिळेल. एकनाथ शिंदे यांना भाजपसोबत लढायचे आहे, कारण शिंदेंची शिवसेना भाजपप्रणित आहे. उद्धव ठाकरेंची शिवसेना काँग्रेसप्रणित आहे. आम्हाला भाजपप्रणित किंवा काँग्रेसप्रणित शिवसेनाच्याऐवजी आम्हाला बाळासाहेबांची शिवसेना प्रमाण आहे. हे करण्याचा प्रयत्न करावा. मतदारही त्याच पद्धतीने विचार करतील. दोन बंधू एकत्र आल्यावर शिवसेनेचे गढूळ झालेले वातावरण शुद्ध होईल, असे आम्हाला वाटत असल्याचे मत कीर्तिकर यांनी व्यक्त केले. तर, आता मला अडीच वर्ष झाली एकनाथ शिंदे यांच्याकडे येऊन. मी एवढे भक्कम संघटनात्मक काम केले. लोकाधिकार समितीच्या चळवळीत राहून काम केले. २० वर्ष आमदार, १० वर्ष खासदार, मंत्री पाच वर्ष एवढा अनुभव असूनही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने माझा कोणताही उपयोग करून घेतला नाही. याची खंत माझ्या मनात आहे, असे यावेळी गजानन कीर्तिकर यांनी स्पष्टपणे म्हटले. शिवसेना ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत हे नेहमीच शिंदेंची सेना ही अमित शहा चालवत असल्याचा दावा करतात. पण आता मात्र, शिंदेंच्या पक्षातील एका बड्या नेत्याने हे विधान केल्याने शिंदेंनी आपला पक्ष खरेच भाजपच्या हाती तर दिला नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

-----------

### बिंदुसरा स्वच्छ झाली ; आ.संदीप

कमी झाला आहे. सोबतच बीड शहरात पाणी साठवणूक करण्यासाठीही व्यवस्था झाली आहे. त्याबद्दल बीड शहरवीसीयांच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. बीड शहरातून बिंदुसरा नदी वाहते. परंतु गेल्या २५ वर्षांपासून या नदीच्या संवर्धनासाठी कसल्याही प्रकारचे काम झाले नव्हते त्यामुळे बीड शहर आणि तालुक्याची जलधारा असलेली बिंदुसरा नदीची अतिशय वाईट अवस्था झाली होती. बीड शहरात पावसाळ्याच्या काळात पुराचा धोका टाळण्यासाठी नदीची स्वच्छता होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. विशेष म्हणजे या महत्वाच्या कामासाठी कसलीही निविदा प्रक्रिया वगैरे वेळ लागणार्या प्रक्रियेतून न जाता आपल्या स्तरावरूनच ना.अजित दादांनी यंत्रणा कामाला लावली. ना.अजितदादांच्या निर्देशावरून २० मे २०२५ रोजी मा. जिल्हाधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन, बीड नगरपालिका प्रशासन आदी कामाला लागले आणि बिंदुसरा नदीची स्वच्छता मोहीम सुरू झाली. गेल्या १७ दिवसांमध्ये अखंडितपणे नदीची स्वच्छता करण्याचे काम सुरू होते. शेवटी ना.अजित दादांमुळेच हे शक्य झाले. ना.दादांच्या सूचनेवरून शासकीय विभाग, विविध सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी जोमाने काम करत बिंदुसरा नदीला अस्वच्छतेच्या विळख्यातून बाहेर काढले. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे गेल्या आठवड्यात पूरपरिस्थीती निर्माण होण्यासारखी अतिवृष्टी झाल्यानंतरही बीड शहराला पूराचा धोका झाला नाही. सोबतच बिंदुसरा धारणाच्या मोठ्या चादरीवरून पाणी वाहीले तरीही बीड शहरात कुठेही पाणी शिरले नाही. ही अतिशय मोठी आणि समाधानकारक बाब आहे. यापुढील काळातही बीब शहराला बिंदुसरा नदीच्या स्वच्छतेमुळे पुराचा धोका अतिशय कमी झाला आहे. याबद्दल ना.अजिदादांचे बीडकर कायम ऋणी असतील अशी भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

-------------

### आज मराठवाड्यातील सर्वात मोठ्या

करून अखंड हरिनाम सप्ताह सुरवात करण्यात आली, यानंतर ज्ञानेश्वरी पारायण श्री ह.भ.प. रमाबुवा महाराज काजळे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. गाथा भजन श्री ह.भ.प.ओंकार महाराज जगताप, श्री ह.भ.प.संजय देवकर, श्री ह.भ.प.मनोहर मुंडे, श्री ह.भ.प.भारतबुवा पठाडे, कंठभूषण श्री अभिमन्यु ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. अतिशय उत्सवात माऊली दादाच्या समाधी पूजन,ग्रंथ दिंडी, व्यासपीठ पूजन, संत ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन,या कार्यक्रमाने आज तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प. महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शन करण्यात आले.

------------

# अंबाजोगाईत चोरट्यांनी कार केली लंपास

अंबाजोगाई । प्रतिनिधी



शहरातील क्रांतीनगर परिसरातील घरासमोर लावलेली स्विफ्ट डिझायर कार अज्ञात चोरट्यांनी (दि.२७) मंगळवार रोजी रात्री आठच्या सुमारास लंपास केल्याची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाभरात चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.अंबाजोगाई() शहरातील अमर अर्जुन वाघमारे (वय २८) रा. क्रांतीनगर यांच्या घरासमोर लावलेली स्विफ्ट डिझायर पांढऱ्या रंगाची कार क्रमांक एमएच ०२ इआर ५७३३ अंदाजे किंमत ४ लाखांची कार चोरून नेल्याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध शुक्रवार (दि.६) अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. ०८ जून २०२५



# वादळीवाऱ्यासह पावसात बाभळीचे झाड कोसळून वीजेची तार तुटली ; ४ दिवसांपासून मंदिर अंधारात

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिर गेल्या ४ दिवसांपासून वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने भास्कर आबदार यांच्या शेतातील रोडलगतचे बाभळीचे झाड विजेच्या तारांवर कोसळल्याने विजेच्या तारा तुटलेल्या आहेत त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला असुन महावितरणला कल्पना देऊनही अद्याप वीज तारा जोडण्यात आल्या नसल्याने भालचंद्र गणपती मंदिर अंधारात असुन भाविकांमध्ये याबद्दल तिव्र नाराजी असुन तातडीने महावितरणने वीजेच्या ताराची जोडणी करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे आणि हरिओम क्षीरसागर यांनी प्रभारी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश यांना केली आहे.

गणपती मंदिर ४ दिवसांपासून अंधारात गणेशभक्तांची गैरसोय :- हरिओम क्षीरसागर



४ दिवसांपूर्वी झालेल्या वादळीवाऱ्यासह पावसात बाभळीचे झाड पडल्याने वीज तारा तुटलेल्या गणपती असुन मंदिरात अंधार असल्याची कल्पना पुजारी श्रीकांत जोशी यांनी मला दिल्यानंतर आज सकाळी सरपंच बालासाहेब जाधव यांना याची कल्पना दिल्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने बाभळीचे झाड बाजुला सारले.प्रभारी उपअभियंता महावितरण उपकेंद्र लिंबागणेश अभिजित शिंदे यांना कल्पना दिल्यानंतर लाईनमन आमीर सय्यद यांना सांगतो म्हणाले परंतु अद्याप वीज तार जोडण्यात आली नाही त्यामुळे मंदिर अंधारातच आहे. गणेश भक्तांची गैरसोय होत असल्याने भाविकात तिव्र नाराजी आहे.

विजेअभावी मंदिरात पिण्याच्या पाण्यासाठी येणाऱ्या ग्रामस्थांची अडचण :- श्रीकांत जोशी, पुजारी भालचंद्र गणपती मंदिर ४ दिवसांपासून मंदिर अंधारात असुन पुजा अर्चना करताना अडचण येते त्याच बरोबर मंदिरात पिण्याच्या पाण्यासाठी येणाऱ्या ग्रामस्थांची तारांबळ होत असुन त्यांना हात हलवत माघारी जावे लागते. वीज जोडणी करण्यात यावी अशी महावितरणच्या अधिकाऱ्यांना मागणी केली आहे परंतु अद्याप जोडणी करण्यात आलीच नाही. लिंबागणेश महावितरण केंद्राचे उपअभियंता पद वर्षभरापासून रिक्त त्यामुळे वेळेवर सुविधा मिळत नाहीत जिल्हा परिषद सर्कलचे गाव असणाऱ्या लिंबागणेश येथील ३३ के.व्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद हुलकुडे यांची बदली झाल्यानंतर गेल्या वर्षभरापासून रिक्त असुन सध्या चौसाळा येथील उप अभियंता अभिजित शिंदे यांच्याकडे प्रभारी पदाचा कार्यभार आहे. उप अभियंता पदी नियुक्ती साठी अधिक्षक अभियंता महावितरण कार्यालय बीड यांना निवेदन तसेच आंदोलनानंतरही पद भरण्यात येईल असे आश्वासन देऊनही अद्याप पद भरण्यात आले नाही त्यामुळे महावितरण कडुन वेळेवर सुविधा मिळत नाहीत त्यामुळे तातडीने रिक्त पद भरण्यात यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.



# जय जवान माध्यमिक विद्यालय येथे ‘शिवस्वराज्य दिन’ उत्साहात साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी.जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव येथील विद्यालयात महाराष्ट्राचे आद्य दैवत,रयतेचे स्वराज्य निर्माण करणारे,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ या दिवशी रायगडावर झाला होता. या दिनाच्या निमित्ताने जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव येथे दि.०६/०६/२०२५वार शुक्रवार रोजी ‘शिवस्वराज्य दिन’ मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्राचार्य श्री. सारोक्ते डी जी सर, तसेच विद्यालयातील विद्यार्थी,सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते .भगव्या स्वराज्य ध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारून त्यास महाराजांच्या पावन प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.व नंतर राज्य गीत सादर करण्यात आले व शिव गर्जना करून कार्यक्रमाची सांगता झाली.छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या सत्तास्थापनेचा हा पावन दिवस! प्रेरणादायी नेतृत्व, स्वाभिमान आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श आजही आपल्याला मार्गदर्शन करतो. जय भवानी, जय शिवाजी! शिवराज्याभिषेक दिनाच्या सर्वांना मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा



# दिव्यांगांना किराणा किट वाटप

**जालना । प्रतिनिधी**

**शासनाच्या नियमाप्रमाणे पीरकल्याण ग्रामपंचायत कडून ५ टक्के निधी मधून दिव्यांगांना किराणा सामानाची किट वाटप करण्यात आली. सदरील किट आ. अर्जुन खोतकर. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे. शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले. यांच्या मार्गदर्शनाखाली पिरकल्याण. ता. जि. जालना ग्रामपंचायत येथे दिव्यांगांना५ टक्के निधीतून किराणा किट वाटप करण्यात आले यावेळी शिवसेना दिव्यांग संघटक श्री अनिल मगदूले. शुभम साबणे रंगनाथ शिंदे. व गावातील दिव्यांग बांधव व गावातील नागरिक तसेच सरपंच ग्रामसेवक व सर्व सदस्य उपस्थित होते**

# विभागीय कार्यशाळेत क्षयरोग आरोग्य तपासणी शिबिर

जालना । प्रतिनिधी

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. कुडलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्र जालना व विभागीय कार्यशाळा (एस.टि. वर्कशॉप) चंदनझिरा यांच्या संयुक्त विद्यामाने ६ जून रोजी क्षयरोग आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वैद्यकीय जिल्हा क्षयरोग केंद्र डॉ. रमेश काकड, डॉ. पी. व्ही. नागदरवाड श्री. स्वप्नील मास्कर यंत्र अभियंता, श्री आर. ए. कोळपे सहाय्यक यंत्र अभियंता, श्री एस.



एस. गायकवाड सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक रा.म. परिवहन महामंडळ , श्री मोरे , गजानन काळे , एस. एस. खंडागळे , राजु पवार , श्रीमती जया मघाडे सार्वजनिक आरोग्य परिचारीका, श्रीमती लक्ष्मी चांदणे, श्रीमती किर्ती चव्हाण, श्रीमती सुनंदा कोरडे यांच्या उपस्थितीत होती यावेळी क्षयरोगाविषयक सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित अधिकारी, कर्मचारी, वाहक, चालक व सर्व कामगारांची क्षयरोग, आयसीटीसी, शुगर व बीपी तपासणी मोफत करण्यात आली.

# धानोरा खु., तट बोरगाव येथे कृषीच्या बत्तीस कलमी कार्यक्रमांतर्गत मोहीम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मे महिन्यामध्ये पडलेल्या पावसामुळे शेतकरी खरीप हंगामाच्या पेरणीचे नियोजन करत आहेत खरीप हंगामामध्ये घेण्यात येणाऱ्या पिकांचे एकात्मिक कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना होण्याच्या अनुषंगाने कृषी विभागाने खरीप हंगाम २०२५ नियोजन आराखडा तयार केला असून त्या अंतर्गत बत्तीस कलमी उपक्रमांची अंमलबजावणीचे नियोजन केले आहे. सदर मोहिमेअंतर्गत कृषी विभागाचे कृषी सहाय्यक पंडित काकडे व नॅचरल शुगर रांजणीचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी संयुक्त विद्यमाने धानोरा खुर्द व तट बोरगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमामध्ये कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी मृदा आरोग्य पत्रिका आधारे सोयाबीन ऊस पिकाचे खत व्यवस्थापन, बियाणे उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक, बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक, सोयाबीन पिकामध्ये रुंद वरंबा सरी तंत्रज्ञानाचा अवलंब, महाडीबीटी पोर्टलवर कृषीविषयक योजनांचे अर्ज दाखल करणे, खरीप हंगामातील पिकांच्या पीक स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवणे, फळबाग लागवड योजना संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली. नॅचरल शुगरचे ऊस विकास अधिकारी येळकर यांनी हिरवळीच्या खतांचा वापर करण्यासाठी करावयाचे नियोजन, बायोचारचा वापर, ऊस पिकांमधील कांडी कीड, गवताळ वाढ, चाबुक कानी रोग व्यवस्थापन करिता करावयाच्या उपायोजना बाबत विस्तृतपणे माहिती दिली त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या पीएम प्रणाम योजनेअंतर्गत नॅचरल शुगर उत्पादित फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर, लिक्विड फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर चा वापर बाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, तालुका कृषी अधिकारी रवी मुंडे, मंडळ कृषी अधिकारी विजयकुमार पवार, कृषी पर्यवेक्षक माचवे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तलाव बंद नलिकेद्वारे जोडावीत

## भाऊसाहेब घुगे यांची जलसंपदा मंत्र्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी**

नदी जोड प्रकल्प अंतर्गत जालना जिल्ह्यातील घाणेवाडी, पीरकल्याण मध्यम प्रकल्प, आणि बदनापूर तालुक्यातील दुधना मध्यम प्रकल्प, वाल्हा लघु व राजेवाडी साठवण तलाव ही धरणे बंद नळीद्वारे जोडण्यात यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली असून या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अभियंत्यांना कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत अशी माहिती भाऊसाहेब घुगे यांनी दिली.जलसंपदा मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात भाऊसाहेब घुगे यांनी म्हंटले आहे की, दुष्काळी आणि अवर्षण प्रवण असलेल्या जालना



व बदनापूर तालुक्यात दुधना-भोरडी -कुंडलिका- कल्याणी नद्यांवर घाणेवाडी, पीरकल्याण मध्यम प्रकल्प, दुधना मध्यम प्रकल्प, वाल्हा लघु व राजेवाडी साठवण तलाव निर्माण करण्यात आले आहेत. कमी पर्जन्यमान ,अवेळी पडणारा पाऊस यामुळे पाच ते सात वर्षातून ही प्रकल्प एकदाच भरतात. असे भाऊसाहेब घुगे यांनी नमूद केले.

दुधना नदीवरील सोमठाणा प्रकल्प भरल्यानंतर अतिरिक्त वाहून जाणारे पाणी वाल्हा प्रकल्पात सोडावे आणि वाल्हातून राजेवाडी प्रकल्पात सोडल्यास तिन्ही प्रकल्प भरून बदनापूर तालुक्यातील ६० ते ७० गावांचा पाण्याचा प्रश्न मिटेल शिवाय बारमाही सिंचनासाठी फायदा होईल.

असे सांगून जालना तालुक्यातील घाणेवाडी, पीरकल्याण मध्यम प्रकल्प बंद नळीद्वारे जोडल्यास शेतीस पाणी मिळून नवी जलक्रांती होईल. असे भाऊसाहेब घुगे यांनी निदर्शनास आणून दिले. दरम्यान धरणे बंद नळीद्वारे जोडण्यासाठी योजना मंजूर करावी अशी मागणी भाऊसाहेब घुगे यांनी केली. त्यांच्या मागणीची दखल घेत छत्रपती संभाजी नगर विभागाच्या मुख्य अभियंत्यांना कार्यवाहीसाठी अग्रेसित करण्यात आले आहे.

# नेत्याच्या वाढदिवसानिमित्त दिला अनाथ मुलांना आधार

## नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख माऊली गोंडे यांच्या उपक्रमाचे कौतुक; शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

वडवणी । प्रतिनिधी

वाढदिवस म्हणलं की बॅनर बाजी तोफांचा आवाज आणि अवाजवी खर्च.. यातून सामाजिक कोणताही फायदा होत नाही. मात्र या अशा अनाठायी खर्चाला फाटा देत आपल्या नेत्याचा वाढदिवस हा सामाजिक सेवेन साजरा झाला पाहिजे.. या उदात्त हेतूने वडवणीचे शिवसेना तालुकाप्रमुख माऊली गोंडे यांनी आपले नेते जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप याचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. त्यामध्ये त्यांनी पसायदान प्रकल्पातील अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य देऊन आधार दिला आणि खाऊ वाटप करून आमरस पोळीचे भोजन दिले. माऊली गोंडे यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

माऊली गोंडे यांची नुकतीच शिवसेनेच्या वडवणी तालुका प्रमुख पदी निवड झाली आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी विश्वास टाकून




त्यांची निवड केली आहे. वडवणी तालुक्यातील चिंचोटी सारख्या ग्रामीण भागातून आलेले माऊली गोंडे मागील ३०-३५ वर्षापासून सामाजिक सेवेमध्ये अग्रेसर आहेत. जिल्हास्तरावर अनिल दादा जगताप यांच्यावर त्यांची खूप मोठी निष्ठा आहे. अनिल दादा जगताप जो निर्णय घेतील त्या निर्णयाचे पालन करतात. सध्या अनिल दादा जगताप जिल्हाप्रमुख आहेत आणि तालुका प्रमुख पदाची माळ माऊली गोंडे त्यांना मिळाल्यामुळे आनंद अगदी द्विगुणीत झाला आहे. अनिल दादा जगताप यांचा वाढदिवस संपूर्ण बीड जिल्हा आणि मराठवाड्यात साजरा होत आहे. मात्र वडवणी तालुक्यात हा वाढदिवस अत्यंत सामाजिक उपक्रमाने झाला पाहिजे. हा उदात्त हेतू समोर ठेवून माऊली गोंडे यांनी निराधारांना आधार देण्याचा निर्णय घेतला. ढेकणमोहा येथील पसायदान प्रकल्पात आपल्या कार्यकर्त्यांसह जाऊन त्यांनी तेथील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. विद्यार्थ्यांसाठी गोडधोड पुरणपोळीच्या जेवणाची सोय केली आणि विद्यार्थ्यांच्या पुढील काळामध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणीमध्ये वडवणी तालुका शिवसेना ही खंबीरपणे पाठीशी राहील. अशी ग्वाही त्यांनी विद्यार्थ्यांसह पसायदान प्रकल्पाचे प्रमुख गोवर्धन दराडे यांना दिली. याबरोबरच त्यांनी वडवणी तालुक्यात देखील विविध ठिकाणी वृक्ष लागवड तसेच शालेय विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप केले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी अनिल दादा जगताप यांचा सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून आणि औक्षण करून वाढदिवस साजरा केला. या कार्यक्रमासाठी शेषराव जगताप, रामदास भाई ढगे, संदीप माने, मानवी हक्क अभियानाचे विष्णू मुजमुले, शिवाजी सावंत, प्रताप मात्रे, दिनेश जाधव, बाळासाहेब बादाडे, कैलास दादा सोळुंके, भरत देवकते, गोविंद गोंडे, दीपक कांबिलकर आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

### वडवणी येथे स्थानिक गुन्हे

दुकानामध्ये गुटखा, पान मसाला, तंबाखु जन्य पदार्थाचा एकुण ४,४९,३००/- रु चा मुद्देमाल बाळगतांना मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस पोलीस स्टेशन वडवणी येथे हजर करुन त्याचे विरुध्द पोउपनि महेश विघ्ने स्थागुशा,बीड यांनी सरकार तर्फे फिर्याद देवुन गु.र.नं १५५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १२३,२२३,२७४,२७५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदरची कामगिरी नवनित काँवत पोलीस अधीक्षक,बीड , सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने , पोह/ राजु पठाण, महेश जोगदंड,राहुल शिंदे, पो अं /बप्पासाहेब घोडके,अर्जुन यादव, चालक गणेश मराडे यांनी मिळुन केलेली आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

पारंपारिक सुभेदार मल्हारराव होळकर ,संत बाळूमामा ,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या देखाव्यासह मोठ्या उत्सवात या शोभयात्रेचे आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव समिती घाटनांदुर यांच्या वतीने करण्यात आले होते या सर्व कार्यक्रमाला घाटनांदुर व परिसरातील नागरिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

### कत्तलखान्याकडे जाणारे

पळून गेले. एकूण १७ गोवंश किंमत २५००००/- दोन लाख पन्नास हजार रुपये चे ताब्यात घेऊन पोलिस कार्यवाही करीत आहेत. सदर कार्यवाही .पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर ,उपविभागीय पोलिस अधिकारी मीना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

### प्रमोद महाजन शासकीय

क्षीरसागर यांनी ही अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. तर प्रमुख वक्ते गुरूगोविंद सोन्नर यांनी शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयीची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनिदेशक श्रीमती एस.ए.क्षीरसागर या होत्या. तसेच विचारमंचावर आयएमसी मेंबर बनसोडे व शिल्प निदेशक श्रीमंत ओव्हाळ हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास होळीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्रीमंत ओव्हाळ यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे प्राचार्य पी.टी.मुने यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील विजय साबळे, भरत म्हेत्रे, राहुल माशाळकर, अमित लोमटे यांच्यासह सर्व शिल्प निदेशक व सर्व तासिका निदेशक तसेच शिल्प निदेशक भाग्यश्री पाटील, शिल्प निदेशक सुवर्णा गवळी, भांडारपाल अभय पोटपल्लेवार अभय, सिनियर क्लार्क निलेश म्हातारमारे, हेड क्लार्क रमेश धस व इतर सर्व कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी संस्थेतील सर्व आजी - माजी प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अत्यंत तळमळीने शिक्षण क्षेत्रात

काम केले ते शांत स्वभावाचे आणि प्रामाणिक असून विद्यार्थ्यांना अतिशय तळमळीने ज्ञानदान करत असतात असे गौरव उद्गार त्यांनी काढले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना देशमुख सर आपल्या विषयाशी प्रामाणिक आणि इमानदार असून त्यांनी सेवाभाव वृत्तीने ज्ञानदान करण्याचं काम केले . गुणवत्ता वाढीसाठी , विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यासाठी अहोरात्र मेहनत त्यांनी घेतली. समाजशास्त्र विषयामध्ये विद्यार्थ्यांना दर महिन्याला टेस्ट घेऊन गुणवत्ता वाढवली. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा.देशमुख यांनी संस्थेने मला खूप सांभाळले आहे.खोलेश्वर महाविद्यालयात काम करत असताना मला दिलेली जबाबदारी किंवा व्यवस्था मी त्याचे पालन केले.मला उभं राहण्यासाठी संस्थेने सहकार्य केले..माझे अनेक विद्यार्थी चांगल्या पदावर कार्य करत आहे याचा मला अभिमान वाटतो ..असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी तर आभार डॉ.अजय दुबे यांनी व्यक्त केले .यावेळी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या कु. भाग्यश्री देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्रा.पांडे सर, चि.गणेश लोकरे ,प्रा सौ अनिता बर्दापूरकर मॅडम, प्रा. कालिदास चिटणीस यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.बिभीषण फड ,उपप्राचार्य गौतम गायकवाड , उपप्राचार्य प्रा डॉ.रवींद्र कुंबेफळकर, उपप्राचार्य आनंद पाठक, पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# खरिपात पीक विम्यासाठी घरबसल्या अर्ज करा!

## फक्त या स्टेप्स फॉलो करा आणि नुकसान भरपाई मिळवा

खरिप हंगामात हवामानातील अनिश्चितता, पाऊस वेळेवर न पडणे, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, कीटक व रोगराई यामुळे अनेक वेळा पिकांचे मोठे नुकसान होते. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून, शेती करताना अनेकदा त्यांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांना पीक नुकसानीपासून संरक्षण मिळावे यासाठी केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री पीक विमा योजना' सुरू केली आहे.

ही योजना शेतकऱ्यांसाठी फार उपयुक्त असून, शेतीतील अनिश्चिततेपासून त्यांचे आर्थिक संरक्षण करते. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कमी प्रीमियममध्ये विमा संरक्षण मिळते आणि जर पीक नुकसान झाले तर नुकसानभरपाईची रक्कम थेट बँक खात्यात जमा होते. ही योजना खरिप, रब्बी आणि वार्षिक व्यावसायिक पिकांसाठी लागू आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑफलाइन प्रक्रिया न करता आता घरबसल्या ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा वापरावी, जेणेकरून वेळ, पैसा आणि श्रम वाचतील. या योजनेचा अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम https://pmfby.gov.in या अधिकृत




वेबसाइटला भेट द्यावी. त्यानंतर 'शेतकरी' म्हणून स्वतःची नोंदणी करावी लागते. यासाठी आधार क्रमांक, बँक खात्याचा तपशील, मोबाईल नंबर ही माहिती आवश्यक असते. नोंदणी केल्यानंतर लॉगिन करून आपल्या गावातील शेती पिकांची निवड करावी. उदाहरणार्थ, जर शेतकरी तांदूळ, सोयाबीन, मका, मूग, उडीद, बाजरी इत्यादी खरिपातील पीक घेत असेल, तर त्यानुसार निवड करून पुढील प्रक्रिया करावी लागते.

त्यानंतर अर्जासोबत काही आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतात. यात आधार कार्ड, ७/१२ उतारा किंवा जमीनधारक कागदपत्रे, बँक पासबुकची झेरॉक्स, पासपोर्ट आकाराचा फोटो, पेरणी केलेल्या पिकांची माहिती इत्यादींचा समावेश असतो. जर भाड्याने शेती करत असाल, तर अधिकृत व नोंदणीकृत भाडेकरार तसेच मालकाची सहमती आवश्यक असते. ही माहिती भरल्यानंतर योजनेनुसार लागणारा प्रीमियम ऑनलाइन भरावा लागतो. हा प्रीमियम पीकप्रकार आणि क्षेत्रानुसार वेगवेगळा असतो, पण तो अतिशय कमी असतो. उदा.खरीप हंगामातील अन्नधान्य व तेलबियांकरिता शेतकऱ्यांना केवळ २ टक्के प्रीमियम भरावा लागतो. प्रीमियम भरल्यानंतर अर्जाची पावती डाउनलोड करून सुरक्षित ठेवावी, ही पावती नुकसान भरपाईसाठी महत्त्वाची असते. या योजनेचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे, जर नैसर्गिक आपत्तीमुळे पीक नुकसानीचे प्रमाण निश्चित निकषांपेक्षा जास्त असेल, तर शेतकऱ्याला थेट बँक खात्यात नुकसानभरपाई मिळते. ही भरपाई केंद्र व राज्य सरकारकडून संयुक्तरीत्या दिली जाते. ही योजना विशेषतः कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी अनिवार्य आहे, पण स्वतंत्र जमीनधारक आणि अधिकृत भाडेकरू शेतकरी देखील या योजनेचा लाभ घेऊ शकतात. आजच्या युगात, शेती ही केवळ उत्पादनापर्यंत मर्यादित न राहता, तिचे योग्य व्यवस्थापन आणि संरक्षण करणेही गरजेचे आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२४ : पेरू येथे भूकंप.
१६५८ : मुघल शासक औरंगजेब यांनी आग्र्याचा किल्ला काबीज केला
१६७० : पुरंदरच्या तहात गमावलेला रोहिडा किल्ला शिवाजी महाराजांनी परत जिंकून घेतला.
१७०७ : औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुअज्जम आणि आझमशाह या त्याच्या दोन मुलांमधे दिल्लीच्या तख्तासाठी युद्ध झाले. यात मुअज्जमने आझमशाहला ठार करुन दिल्लीची गादी बळकावली.
१७१३ : मुघलांनी १६८९ मधे जिंकलेला रायगड किल्ला पंतप्रतिनिधी यांनी सिद्दीकडुन राजकारणाने जिंकुन घेतला.
१७८३ : आईसलँड मधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक, हजार ठार.
१९१२ : कार्ल लेम्ले यांनी यूनिव्हर्सल पिक्चर्स या कंपनीची स्थापना केली.
१९१५ : टिळकांनी मंडाले तुरुंगात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून पुर्ण केला.
१९१५ : लो. टिळक यांचे मंडालेच्या तुरुंगातून सुटका.
१९१८ : नोव्हा ॲक्विला या सर्वाधिक तेजस्वी तेजोमेघाचा शोध.
१९४१ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी सीरीया व लेबानॉन पादाक्रांत केले.
१९४८ : भारत व इंग्लंड यांच्या दरम्यान एअर-इंडियाची हवाई सेवा सुरु.
१९४८ : जॉर्ज ऑर्वेलची १९८४ या नावाची कांदबरी प्रसिद्ध झाली.
१९५३ : कृष्णवर्णीयांना हॉटेलमधे सेवा नाकारण्यास अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली.
१९६८ : बर्मोडा देशाने संविधान अंगिकारले.
१९६९ : लष्करप्रमुख म्हणून सॅम माणेकशा यांची नियुक्ती.
१९९२ : पहिल्यांदा जागतिक महासागर दिन साजरा केला गेला.
२००४ : आधुनिक काळातील शुक्राचे (सूर्यावरुन) पहिले अधिक्रमण झाले. याआधीचे अधिक्रमण १८८२ या वर्षी झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०६ : भारतीय क्रिकेट खेळाडू सैयद नझीर अली यांचा जन्म.
१९१० : दिनकर केशव बेडेकर, तत्त्वचिंतक, समीक्षक, लेखक (मृत्यू: २ मे १९७३)
१९१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट २०१५)
१९१७ : गजाननराव वाटवे, भावगीत गायक आणि संगीतकार. (मृत्यू: २ एप्रिल २००९)
१९२१ : इंडोनेशिया देशाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष सुहार्तो यांचा जन्मदिन.
१९२५ : बार्बरा बुश, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुशची पत्नी व जॉर्ज डब्ल्यु. बुशची आई.
१९३२ : सैयद नझीर अली, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भैतिकशास्त्रज्ञ केनिथ गेडीज विल्सन यांचा जन्म.
१९५५ : वर्ल्ड वाईड वेब चे जनक टिम बर्नर्स-ली यांचा जन्म.
१९५७ : चित्रपट अभिनेत्री डिंपल कपाडिया यांचा जन्म.
१९७५ : शिल्पा शेट्टी, भारतीय अभिनेत्री आणि निर्माता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३२ : इस्लाम धर्माचे संस्थापक मोहंमद पैगंबर यांचे निधन.
१७९५ : फ्रान्सचा राजा लुई १७ वा यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १७८५)
१८०९ : अमेरिकन विचारवंत राजकारणी थॉमस पेन यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १७३७)
१८४५ : अमेरिकेचे वे७ राष्ट्राध्यक्ष ॲन्ड्र्यू जॅक्सन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १७६७)
१९९५ : रंगभूमी कलावंत एकपात्री प्रयोगकार राम नगरकर यांचे निधन.
१९९८ : नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष सानी अबाचा यांचे निधन.
२००९ : लोकप्रिय भारतीय उर्दू-हिंदी नाटककार, चित्रपट दिग्दर्शक, कवी आणि अभिनेता हबीब तनवीर यांचे निधन.

## बोगस बियाणे, खते विक्री करणाऱ्यांना चाप

### १७ कृषी सेवा केंद्रांना तातडीने विक्री बंद करण्याचे आदेश

पुणे : खरीप हंगाम सुरू होत असतानाच बोगस बियाणे, खते आणि कीटकनाशकांची विक्री करणाऱ्या काही विक्रेत्यांविरुद्ध कृषी विभागाने कडक कारवाई सुरू केली आहे. जिल्ह्यातील १७ कृषी सेवा केंद्रांना तातडीने विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, शिरूर तालुक्यातील एका खासगी कंपनीवर बेकायदा खत साठाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी जिल्हा कृषी विभागाने १५ भरारी पथके तयार केली आहेत. ही पथके जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील कृषी सेवा केंद्रांवर अचानक धाडी घालून तपासणी करत आहेत. या तपासणीत अनेक केंद्रांवर गंभीर अनियमितता आढळल्या आहेत. जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक धनंजय पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तपासणीत १५ कृषी सेवा केंद्रांवर उघडपणे नियमभंग झाल्याचे आढळले असून त्यांच्यावर तत्काळ विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या केंद्रांमध्ये सात खत विक्री केंद्रे, नऊ बियाणे विक्री केंद्रे, एक कीटकनाशक विक्री केंद्रांचा समावेश आहे. बियाणे, खते, कीटकनाशके जादा दराने विकणे, खरेदी पावती न देणे, दुसऱ्या निविष्ठेच्या खरेदीसाठी सक्ती करणे, निविष्ठा उपलब्ध असूनही विक्री न करणे, मुदतबाह्य निविष्ठा विकणे, या प्रकारांमध्ये शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय अथवा कृषी विभागाच्या नियंत्रण कक्षास संपर्क साधावा, असे कृषी विभागाकडून आवाहन केले आहे.

०००

कोणकोणत्या त्रुटी आढळल्या?

बियाण्याच्या परवान्यात उगमपत्राचा (बियाण्याचा मुख्य स्रोत) अभाव,अधिक दराने विक्री,परवाना नूतनीकरण विहित नमुन्यात न करणे,शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, शेतकऱ्यांना पक्की खरेदी पावती न देणे, निविष्ठा उपलब्ध असूनही विक्रीस नकार देणे, एक निविष्ठा घेताना दुसरी जबरदस्तीने घेण्याची अट, मुदतबाह्य निविष्ठांची विक्री

## जनावरांतील धनुर्वात : कारणे आणि उपाय

साध्या जखमेतूनही जनावरांना धनुर्वात या जिवघेण्या आजाराचा संसर्ग होऊ शकतो. धनुर्वात हा जनावरे आणि मानसाच्या मज्जातंतूंना जडणारा विषजन्य आणि जीवघेणा आजार आहे. : धनुर्वाताचे जिवाणू हे माती आणि बहुतांश प्राण्यांच्या आतड्यांमध्ये असतात. माती, धूळ आणि गंजलेल्या टोकदार वस्तूंवर धनुर्वाताचे जिवाणू मोठ्या संख्येने असतात. जखमेचा संपर्क माती, धुळीसोबत आल्यास किंवा गंजलेल्या लोखंडाच्या वस्तूने जखम झाल्यास या जिवाणूचा संसर्ग होऊ शकतो. हे जिवाणू शरीरात वाढीदरम्यान विष तयार करतात. या विषाचा थेट परिणाम मज्जातंतूंवर होतो. त्यामुळे जनावराचा चेहरा आणि इतर स्नायू आखडले जातात. विशेष म्हणजे या आजाराची लागण बाधित प्राण्याच्या संपर्कातून, खाद्य, पाणी तसेच हवेतून होत नाही. तर कोणत्याही प्रकारची जखम तसेच अगदी साध्या ओरखड्यातूनही हे जिवाणू शरीरात शिरतात. गाय, कुत्रा, मांजर आणि वराहामध्ये या आजाराला प्रतिकार करण्याची शक्ती जास्त असते. पण शेळ्या, मेंढ्या, घोडा आणि मानसांमध्ये धनुर्वाताच्या जिवाणूचा संसर्ग जास्त प्रमाणात आढळतो. नवजात पिलांमध्ये नाळ कापताना झालेल्या संसर्गातून तत्काळ संक्रमण होऊन धनुर्वात होवू शकतो.

आजाराची लक्षणे :शरीरात जिवाणूंनी प्रवेश केल्यानंतर ३ ते १४ दिवसांत आजाराची लक्षणे दिसू लागतात. ज्या ठिकाणी हे जिवाणू शरीरात प्रवेश करतात आणि वाढतात, त्या ठिकाणापासून विष रक्तप्रवाहात मिसळून चेतापेशींपर्यंत पोहोचून चेतापेशींना इजा करते. विषाचा परिणाम मेंदू,



मज्जासंस्था तसेच पाठीच्या कण्यावर होतो. नसा काम करण बंद करतात. त्यामुळे स्नायूंची हालचाल बंद होते. स्नायू आखडतात. जनावराला हालचाल करता येत नाही. जनावर खाली पडते. जबडा उघडता व बंद करता येत नाही. पाणी पिणे, खाद्य खाणे बंद होते. शरीरातील सर्व स्नायू आकुंचन पावतात. योग्य उपचार वेळेत न मिळाल्यास जनावराचा मृत्यू होऊ शकतो.

प्रतिबंध आणि उपाय :जनावरांमध्ये विशेषतः घोड्यांमध्ये टेटॅनस टॉक्सोइडचे (टी.टी.) लसीकरण करावे. गाभण जनावरांना धनुर्वाताची लस द्यावी. त्यामुळे मातेकडून अर्भकांना प्रतिकारशक्ती मिळते. अर्भकांना धनुर्वात होत नाही. जखम झाल्यास, ती स्वच्छ करावी. जखम धुण्यासाठी योग्य प्रतिजैविकांचा वापर करावा. गोठ्यांची स्वच्छता ठेवावी. जिवाणूंची संख्या कमी करण्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविकाचा वापर करावा. जखमी जनावराला धनुर्वाताची लस द्यावी. हा आजार जर टाळायचा असेल तर आपल्या जनावरांना जखमा होऊ न देणे हेच चांगले.

## भूजल पातळी वाढविणाऱ्या पाझर तलावाचे नियोजन

पाणलोटक्षेत्रात वाहून जाणारे पाणी अडविले जाऊन शेतीकरिता व त्या क्षेत्रातील भूजल पुनर्भरणाकरिता त्याचा वापर होऊ शकतो. पाझर तलाव म्हणजे नैसर्गिक नाला किंवा ओढ्यावर आडवा बांधलेला आणि पाणलोटक्षेत्रातून गोळा होणारा प्रवाह अडवून तो जास्तीत जास्त दिवस साठवून, तो जमिनीत मुरवून त्या क्षेत्रातून भूजलाची पातळी वेगाने वाढविणाऱ्या बंधाऱ्यामुळे तयार होणारा जलाशय.



पाझर तलावामुळे पाण्याबरोबर वाहून जाणारी सुपीक मातीदेखील अडविली जाते. जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी दुष्काळी प्रदेशात पाझर तलावाचे बांधकाम करतात. पाझर तलावाचे बांधकाम करताना अशा पद्धतीने करावे की, पावसाळ्यात तलाव संपूर्ण भरावा आणि हिवाळ्यापर्यंत सर्व पाणी पाझरून/ मुरून आजूबाजूच्या विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होते. ज्या ठिकाणी पाझर तलावाचे बांधकाम असते, त्या ठिकाणी जमिनीचा थर पाझरास योग्य असावा लागतो. पाझर तलावाचे मुख्य कार्य म्हणजे त्यामध्ये साठविलेले पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे. पाझर तलाव हा सच्छिद्र भूभागावर बांधला, तरच त्याचे फायदे मिळू शकतात. म्हणून पाझर तलाव हा एखाद्या भारी अथवा अभेद्य जमिनीवर बांधू नये, की ज्यामुळे पाझर तलावाच्या मुख्य कार्याला बाधा होईल.

तलाव बांधताना घ्यावयाची काळजी :पाझर तलाव अशा ठिकाणी बांधावा, की तेथील जमिनीचा वरचा थर सच्छिद्र असेल आणि त्याखालच्या कमीत कमी तीन मीटर जाडीचा थर हा जास्तीत जास्त झिजलेला असेल. अशा प्रकारच्या जमिनीवर बांधलेल्या तलावामुळे भूजल पुनर्भरणाचा वेग वाढतो. पाझर तलावाच्या खालच्या बाजूला अथवा परिणाम क्षेत्रात पिकायोग्य जमीन मोठ्या प्रमाणात असणे आवश्यक आहे. अशी मोठ्या प्रमाणातील शेतजमीन असल्याने पाझर तलावाचा जास्तीत जास्त उपयोग करून शक्य होते.

त्याचप्रमाणे या भागात अनेक विहिरी असणे किंवा नवीन विहिरी खोदण्यालायक क्षेत्र असणे गरजेचे आहे, की जेणेकरून त्या भागाला सिंचनाखाली आणणे सहजशक्य होईल. लहानात लहान पाझर तलावाच्या क्षेत्राची लांबी एक किमी असते. पाझर तलावामध्ये जास्त होणारे पाणी काढून टाकण्यासाठी सांडव्याची साधी, आर्थिकदृष्ट्या परवडणारी आणि कार्यक्षम व्यवस्था करता येणे भौगोलिकदृष्ट्या शक्य व्हावयास हवे.

तलाव बांधण्याचे योग्य ठिकाण :

पुरेशा सच्छिद्र भूस्तरावर पाझर तलाव बांधताना तो एखाद्या खोल दरीसारख्या भागात बांधावा, जेणेकरून खोल तळे तयार होईल. पाणी कमीत कमी क्षेत्रावर पसरेल. उथळ तळ्यापेक्षा असे खोल तळे तयार केल्याचे दोन फायदे आहेत. एक म्हणजे ऊन-वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारे पाण्याचे बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होते. कमीत कमी जमीन पाण्याखाली बुडते. दुसरा फायदा म्हणजे तलावातील पाणी अडविण्याकरिता निवडलेले क्षेत्र जर पुरेसे सच्छिद्र नसेल तर त्याचे साठवण क्षेत्र वाढवावे, ज्यायोगे अधिक पाणी जमिनीत मुरू शकेल. ज्या पाणलोटक्षेत्रामधून पाझर तलावामध्ये पाणी येणार आहे, त्यात योग्य प्रमाणात झाडेझुडपे व गवत असावे, की ज्यामुळे मातीची धूप होणार नाही. जर अशा प्रकारची व्यवस्था नसेल, तर त्या पाणलोटक्षेत्रात मृद्संधारणाची कामे हाती घ्यावीत; अन्यथा ती वाहून आलेली माती पाझर तलावात साठून त्याची साठवणक्षमता कमी होऊ शकते. पाझर तलावाचा भराव तयार करण्याकरिता योग्य प्रकारची माती इतर बांधकाम साहित्य त्या क्षेत्रातच उपलब्ध होणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. बाहेरून साहित्य वाहून आणून भराव तयार करण्यामुळे खर्चात अनावश्यक वाढ होऊ शकते.

## आता घरी बसूनच करा जनावरांची गर्भधारणा चाचणी!



पशुपालकांनो आता तुम्ही तुमच्या जनावरांची गर्भधारणा घरीच तपासू शकता! हो तुम्ही जे वाचलेत ते अगदी खरं आहे. भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाने विकसित केलेले ''प्रेगा-डी'' नावाचे हे किट जनावरांच्या लघवीच्या दोन थेंबांमधून गर्भधारणा निश्चित करते.

नियामतपूर येथील कृषी विज्ञान केंद्र, पशु संवर्धन विभागाचे तज्ज्ञ डॉ. शिवकुमार यादव यांनी या किटबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, ''हे किट वापरणे सोपे आहे आणि परिणाम त्वरित दिसून येतो. यामुळे पशु पालकांना वेळीच योग्य निर्णय घेता येतील आणि त्यांच्या जनावरांची चांगली काळजी घेता येईल.किटचा वापर कसा करायचा?

प्रेगा-डी किट जनावरांची औषधे विकणाऱ्या मेडिकल स्टोअरमधून किंवा डॉक्टरांकडून १० रूपयांना खरेदी करा. गाय किंवा म्हशीच्या मुत्राचे दोन थेंब किट मधील चाचणी ट्यूबमध्ये टाका. काही सेकंदात, डिस्प्लेवर रंग बदल होईल. गडद लाल किंवा जांभळा रंग: प्राणी गरोदर आहे. पिवळा किंवा हलका रंग: प्राणी गर्भवती नाही. गर्भधारणा तपासणी किटचे फायदे : वेळेची बचत होऊन आणि खर्च कमी होईल. अचूक परिणाम मिळते. पशुपालकांना जनावरे गर्भार आहेत हे कळल्यावर त्यांची चांगली काळजी घेता येईल. गर्भाचा चांगला विकास होईल. निरोगी जनावरे आणि चांगले दूध उत्पादन मिळेल.

# सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय?

**सामाजिक न्यायमंत्र्यावर टाहो फोडण्याची वेळ**

**लाडकी बहिण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा ८२० कोटी ६० लाखांचा निधी पुन्हा वळवला**

बीड । प्रतिनिधी

लाडकी बहिण योजनेसाठी राज्य सरकारने पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१० कोटी ३० लाखांचा निधी वळवला असुन यावरून सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाटांनी जाहिररित्या अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केल्याने एकंदरीतच सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय असे म्हणण्याची वेळ आल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले असुन या आधीही ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी वळविण्यात आला होता. आतापर्यंत सामाजिक न्याय व विशेष विभागाचा एकुण ८२० कोटी ६० लाख रुपये वळविण्यात आले आहेत.आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी ३ वेळा वळविण्यात आला असून एकुण आदिवासी विभागाचा आतापर्यंत १ हजार ७ कोटी रुपये वळविण्यात आले आहेत. एकंदरीतच सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे मिळुन लाडकी बहिण योजनेसाठी १८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक न्याय विभागाला मागील ५ वर्षाच्या तुलनेत यावर्षीची ७,३१७ कोटी रुपयांचा निधी कमी मिळाला आहे. वर्षभरात तब्बल ६ हजार ७६५ कोटी रुपयांचा सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला जाणार आहे.

**मागील ५ वर्षात प्रत्यक्षात आलेली तुट**

सन २०२१-२२. ४,७०५ कोटी
सन २०२२-२३. ५,४७० कोटी
सन २०२३-२४. ६४७६ कोटी
सन २०२४-२५ ६७६४ कोटी
सन २०२५-२६. ७३१४ कोटी

हा अनुसूचित जाती व आदिवासी समाजातील लोकांवर अन्याय असुन याविरोधात आंदोलनाचा ईशारा डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, शेख मुबीन,रामधन जमाले यांनी दिला आहे.

आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाच्या लोकसंख्येनुसार निधी वितरित करण्यात यावा असा नियम आहे. मात्र सामाजिक न्याय विभागात कमी निधी मिळाल्याचं पहायला मिळत आहे .महाराष्ट्रात एकूण ११.२३ कोटी लोकसंख्या आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या १.३३ कोटी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ११.८४% अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाला एकूण तरतुदींच्या ११.८४% निधी मंजूर होणे अपेक्षित असताना ८ ते साडे ८ टक्के निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे २.४४ % तूट आहे. यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २९ हजार ९७२ कोटी रुपये मंजूर झाला आहे. त्यातील जवळपास ५००० कोटी लाडकी बहीण आणि इतर योजनांसाठी तरतूद केली आहे. त्यामुळे २९ हजार ९७२ कोटी पैकी २२ हजार ६५८ कोटी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसाठी आहे. त्यामुळे एकूण बजेटच्या ७३१४ कोटी रुपयांची तूट पहायला मिळत आहे.मागील ५ वर्षातील आकडेवारी पाहता यावर्षी सर्वाधिक तुट सामाजिक न्याय विभागाची पहायला मिळत आहे. त्यामुळे वित्तमंत्री अजित पवार यांनी केलेला दावा आणि प्रत्यक्षात मिळालेला निधी यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २२ हजार ६५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.लाडकी बहिण आणि ईतर योजनांच अतिरिक्त मिळुन २९हजार ९३२ कोटींचा निधी आहे.तरीही सामाजिक न्याय विभागामध्ये ७३१४ कोटी म्हणजेच एकूण बजेटच्या २.४४ टक्के निधी कमी प्राप्त झालेला आहे.

# पाटोदा शहरासाठी ८५ कोटीची जल योजना ठरणार मृगजळ ?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरासाठी राबवण्यात येत असलेल्या ८५ कोटीच्या लांजेश्वर इट जल योजनेत दर्जाहीन साहित्याचा वापर होत असल्याची तक्रार समोर आली आहे सध्या सुरू असलेल्या पाण्याच्या योजनेत वापरण्यात येणाऱ्या पाईप्स निकृष्ट फुटक्या छिद्र पडलेल्या अवस्थेत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष शिवसेना यांनी केले आहे पाण्याच्या योजनेत अशा प्रकारचा दर्जाहीन म** वापरल्यास पाठवण्यात पाण्याचा थेंबही पोहोचणार नाही अशी स्थानिक नागरिकांची तीव्र नाराजी आहे पाण्याच्या पाईप्स गार्डन अनेक ठिकाणी फुटलेल्या गांजलेल्या अवस्थेत आढळल्या या पार्श्वभूमीवर नगरपंचायत योजना सांभाळू शकेल का असा प्रश्न निर्माण झाला आहे प्रशासनाने विद्यमान योजनेचे अस्तित्व क्षमतेचा विचार केला नाही असा देखील आरोप करण्यात आला असून या बोगस कामाच्या विरोधात लेखी तक्रार देण्यात आली असून जबाबदार अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे

गेल्या पंचवीस तीस वर्षापासून पाठवण्यात विविध जल योजना राबविण्यात आल्या मात्र त्यापैकी बहुतेक योजना आदेश आले जीवन प्राधिकरण वर्धित वेग या योजनांसाठी पटवर्धन रुपये खर्च करण्यात आले पाण्याच्या टाक्या उभार उभ्या राहिल्या पण त्यात पाणी आले नाही संपूर्ण शहरासाठी मीन पाईपलाईन वितरणासाठी आधी ३२ लाखाची योजना झाली जी काही महिन्यातच रस्त्याच्या कामात उद्वस्त झाली त्यानंतर ७५ लाख १६ लाख कोटी २४ लाख तीन कोटी रुपयांचा देखील राबवण्यात आल्या तरीही शेअर वासियांना नशीबी पाणीटंच राहिली महासंग प्रकल्पातून जवळपास चार-पाच किलोमीटर अंतरावर नैसर्गिक पद्धतीने पाणी उपलब्ध असताना २० ३० किलोमीटर अंतरावरील लांजसरी येथील पाणी आणण्याचा निर्णय घेण्यात आला

# महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा



वडवणी । प्रतिनिधी

संस्कार शिक्षण मंडळ,वडवणी संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शुक्रवार दि.६ जून २०२५ रोजी शिवस्वराज्य दिन मोठा उत्साहात साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की,छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर राज्याभिषेक करून लोककल्याणकारी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ६ जून शिवराज्याभिषेक दिन हा महाराष्ट्र शासनाने २०२१ पासून शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे यावर्षी ३५२ वा शिवस्वराज्य दिनानिमित्त वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारून राष्ट्रगीत,राज्यगीत गायन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करून शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक डोईफोडे सर,मराठी वाङ्मय विभाग प्रमुख श्रीमती शोभाताई मॅडम,श्री.घोळवे सर,श्री.निवरकर सर,श्री.चांदणे सर,प्रा.कांबळे सर,प्रा.मुंडे सी. व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,प्रा.डाके सर,प्रा.केदार सर,श्री.सावंत सर,श्रीमती फलके मॅडम, घुले, दिव्या, प्राध्यापिका कचरे, प्राथमिक उघडे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपसभापती मोरे नाना यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव

**वाढदिवसानिमीत्त सर्वच क्षेत्रातील मान्यवरांकडुन सत्कार**

माजलगाव । प्रतिनिधी

**बहुजन विकास मोर्चाचे नेते, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, बाबुराव पोटभरे यांचे खंदे समर्थक श्रीहरी नाना मोरे यांच्या वाढदिवसानिमीत्त राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच मान्यवरांकडुन शुभेच्छांचा वर्षाव झाला तर दिवसभर सत्कार व सोशल मिडीयावरही शुभेच्छांचा धुमाकुळ दिसुन आला अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील शुभेच्छा दिल्या.**



सर्वसामान्यांच्या कुठल्याही कामात अपेक्षेविना तुमचं काम होउन जाईल असं बोलन व ते काम करून घेण हा स्वभाव असल्याने जिल्हाभरात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या चाहत्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. लोक कमावणारा नेता, समाजात देखाव्यासाठी मोठेपणा न करता बहुजन, वंचित, उपेक्षित व सर्वच जाती धर्मातील लोकांच्या कामांना न्याय देण्यासाठी झटणारे मोरे नाना आज लोकप्रिय झाले आहेत. समाजात तुमचं असणारं प्रामाणिक कामं, अन्यायाविरूध्द लढणारा निडर स्वभाव, राजकारणातील भुमिका अशी वैशिष्टे श्रीहरी नाना मोरे यांची आहेत. दि. ७ जुन रोजी वाढदिवसानिमीत्त दिवसभर त्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले तर दिवसभर देखील तरूणांसह सर्वच जाती धर्मातील लोकांची त्यांच्या निवासस्थांनी ये - जा होती. अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या. पुरूषोत्तमपुरी, सादोळा, केसापुरी, फुलेपिंपळगाव, गंगामसला, खरात आडगाव, कल्याणनगर, लवुळ, राजेवाडी, पुरूषोत्तमपुरी सह तालुक्यातील अनेक गावातील लोकांनी यथोचित सत्कार करत नानांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले तर किट्टी आडगावात तरूणांनी तर कार्यक्रम घेवुन सत्कार केला. यात राजकीय नेते, कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर, वकील, सर्व स्तरातील सर्व जाती धर्मातील प्रतिष्ठीत नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी व सत्कारासाठी मोठी गर्दी केली होती त्याचबरोबर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील पत्राव्दारे मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या.

# बांगरवाडी तलावाच्या संरक्षक भिंतीला तडे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील बांगरवाडी येथील तलावाच्या भिंतीला तडे गेले आहेत त्यामुळे तलावाला गळती लागणे शक्यता ना करता येत नाही जलसंपदा विभागाने येणाऱ्या काळातील संभाव्य धोका टाळण्यासाठी तलावाच्या दुरुस्तीचे काम तातडीने करणे आवश्यक आहे या कामासाठी तीन वर्षांपूर्वी मान्यता देण्यात आली होती परंतु त्या मान्यता रद्द करण्यात आले आहे त्या पुन्हा मिळून तलावाच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी लवकरच जलसंपदा मंत्री यांची भेट घेऊन प्रश्न मार्गी लावणार आहे असे आमदार सुरेश यांनी सांगितले आष्टी पाटोदा तालुक्यातील लहान गाव तलाव बाजार तलावाची दुर्वास झाले आहे तलावातील बांगरवाडी तलावाच्या भिंतीला तरी गेले आहेत त्यामुळे तलावा लागतील अशी शक्यता आहे त्याचप्रमाणे तालुक्यातील अनेक तलावांना अशा अशाप्रकारे गळती लागले आहे पाणी गळती होऊन पाणीसाठा कमी देखील झाला आहे तीन वर्षांपूर्वी जलसंपदा विभागाने सिंचन प्रकल्पाच्या दृष्टीसाठी प्रशासकीय मान्यता देऊ नये निधी देखील दिला होता परंतु प्रत्यक्ष काम सुरू झाले या प्रशासनाने मंजुरी रद्द केली बांगरवाडी तलावर शेकडो हे कर्ज योजना केले गावंडे सस्ते वस्ती करंजवण जलसिंचन प्रकल्पासाठी निधी मंजूर झाला होता बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे आणि प्रशासकीय उदासीनेमुळे कोणतेच काम झाले नाही जोगेश्वरी गंगादेवी येथील प्रकल्प देखील हीच अवस्था झाली आहे आपत्ती व्यवस्थान निधी तून दुरुस्ती प्रस्ताव तयार करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करण्यात आले सांगितले आहे



**माजलगाव :- येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना ) मोरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे,संचालक प्रभाकरराव होके, मनोज जगताप, संजय कचरे, नंदकिशोर सजगणे, भगवानराव आगे,अमोल जाधव,कादिर पठाण सचिव हरिभाऊ सवणे,लेखापाल उध्दव फपाळ,आडत उपाध्यक्ष बंडू इके**

## वंचितच्या परिसंवाद मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहा-गणेश वीर

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये वंचित बहुजन आघाडीने अत्यल्पकाळात नावलौकिक मिळवून जवळपास अष्टयात्तर लक्ष मतदान घेऊन प्रस्थापित पक्षांना हादरा दिला.वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी मराठा आरक्षण असो, ओबीसी आरक्षण असो किंवा विविध अन्याय अत्याचाराच्या घटनांमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी ते रस्त्यावरचा लढा अविरतपणे लढत आलेले आहेत.

धार्मिक व जातीयतेच्या पलीकडे जाऊन त्यांनी सबंध राज्यात वंचित उपेक्षितांची मजबूत मोठ बांधली. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वंचित बहुजन आघाडी ताकतीने निवडणूक लढवणार असून बीड जिल्ह्यातील गणप्रमुख, गटप्रमुख, पदाधिकारी कार्यकर्त्यांसाठी परिसंवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून हा परिसंवाद मेळावा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आठ जून २०२५ रोजी दुपारी एक वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमास फुले शाहू आंबेडकर विद्वत्त सभेचे मार्गदर्शक भास्कर जी भोजने साहेब मार्गदर्शन करणार आहेत. तरी या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडी,युवा आघाडी महिला, आघाडी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या आजी-माजी,पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे बीड तालुका उपाध्यक्ष गणेश (दादा) वीर यांनी केले आहे.

# ऑलम्पियाड परिक्षेत स्वामिनी नखाते जिल्ह्यातून प्रथम

## गोल्डमेडल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून एएसपी चेतना तिडकेंच्या हस्ते झाला सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

२०२४ मध्ये झालेल्या ऑलम्पियाड परिक्षेत बीड येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कुलची विद्यार्थीनी स्वामिनी अभिजीत नखाते हिने जिल्ह्यातून पहिला क्रमांक पटकावला आहे. त्यानुसार बुधवारी तिचा गोल्डमेडल, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देवून अंबाजोगाईच्या अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. स्वामिनीचा हाच सत्कार स्विकारताना तिचे तिचे प्राचार्य गणेश काकडे, वडिल दै. लोकाशाचे उपसंपादक अभिजित नखाते, आई प्रियंका नखाते, भाऊ समर्थ नखाते यांची उपस्थिती होती. यशाच्या शिखरावर पोहोचल्यावर कधी अपयश आले तर खचून न जाता परत उभे राहिले पाहिजे. आयुष्याच्या शिखरावर पोहोचल्यावर मोडून पडू नका असे प्रतिपादन यावेळी एएसपी चेतना तिडके यांनी केले. बीड सहोदया संस्थेतर्फे अंबाजोगाई येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे दहावी, बारावी आणि ऑलम्पियाड परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोदार इंटरनॅशनल स्कूल अंबेजोगाई चे प्राचार्य कीर्तीकुमार देशमुख यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर शारदा इंग्लिश स्कूल केजचे प्राचार्य सोनल मिश्रा यांनी बीड सहोदया चा अहवाल सादर केला. या सोहळ्यासाठी प्रतिष्ठित अतिथी प्रा.अभिजीत लोहिया, ॲड. संतोष पवार, आणि फिजिक्सवाला अकॅडमीचे डॉन बॉस्को जोसेफ यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.




यावेळी बीड येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कुलची विद्यार्थीनी स्वामिनी अभिजीत नखाते हिचाही सन्मान करण्यात आला. तिने इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असताना ऑलम्पियाड परिक्षा दिली होती. या परिक्षेत तिने बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावेळी तिला अंबाजोगाईच्या अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके यांनी भरभरून शुभेच्छा दिला. हा सन्मान स्विकारताना तिच्यासोबत तिचे प्राचार्य गणेश काकडे, तिचे वडिल दै. लोकाशाचे उपसंपादक अभिजित नखाते, आई प्रियंका नखाते, भाऊ समर्थ नखाते हेही उपस्थित होते. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींची उपस्थिती या कार्यक्रमाला शोभा देत होती. मुख्य वक्ता चेतना तिडके यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना जीवनाबद्दलचे महत्त्वाचे विचार मांडले. त्यांनी प्रसिद्ध अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्टच्या कवितेच्या ओळींचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना जीवनसंघर्षाबद्दल प्रेरणा दिली. स्वतःचे सकारात्मक आणि नकारात्मक गुण लिहून काढा आणि त्यावर ठोस काम करा. सकारात्मक गुणातून आपल्याला नवी ऊर्जा मिळते आणि ती आपल्याला पुढे नेऊन जाते, असा व्यावहारिक सल्ला त्यांनी दिला. प्रा.अभिजीत लोहिया यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व पटवून दिले. अभ्यासाबरोबर आरोग्यावर सुद्धा लक्ष केंद्रित करावे. शारीरिक आणि मानसिक आरोग्याशिवाय केवळ पुस्तकी ज्ञान कामी येत नाही, असे त्यांनी प्रतिपादन केले. आधार माणुसकीचा फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संतोष पवार यांनी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील आव्हानांकडे लक्ष वेधले. दहावी आणि बारावी नंतरचा प्रवास हा खरोखरच खडतर प्रवास आहे. पुढील शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर जावे लागणार आहे, त्यामुळे समाजामध्ये कसे वागावे, कसे जगावे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे त्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवणार्या शौर्य मुगदिया या विद्यार्थ्याच्या आई डॉ.रेखा मुगदिया यांनी व्यक्त केलेले विचार होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे आम्ही त्याचे पालक दोघेजण डॉक्टर असून आमचा मुलगा इंजीनियरिंगची तयारी करतो. बीड सहोदयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. एमआयटी शाळेचे प्राचार्य सागर राऊत यांनी बीड सहोदया ऑलिम्पियाडचा तपशीलवार अहवाल सादर केला. या कार्यक्रमात बीड सहोदया ओलंपियाड मधून जिल्ह्यात प्रथम द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचाही त्यांच्या पालकांसमवेत सत्कार करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोदार इंटरनॅशनल स्कूल आंबेजोगाईच्या अनुभवी शिक्षिकेने अत्यंत कुशलतेने केले. शाळेचे प्रशासकीय अधिकारी प्रताप रसाळ यांनी कार्यक्रमाला योग्य गती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन ईगलवूड इंग्लिश स्कूल माजलगावचे प्राचार्य सत्यजित कांजळकर यांनी केले.

## परिसंवाद मेळाव्यास प्रचंड संख्येने उपस्थित रहा-अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ साली वंचित बहुजन आघाडी या पक्षाने उडी घेतली अन्? प्रस्थापितांच्या उरात धडकी भरवत ४४ लाख मतदान लोकसभेला मिळविले विधानसभेला तो टक्का कमी कमी होत गेला याचे एकमेव मुख्य कारण म्हणजे काही स्वयंघोषित बुद्धिजीवी विचारवंत यांनी प्रस्थापितांच्या हाताला धरत त्यांच्याकडून गाड्या पैसे घेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतलेले निर्णय भूमिका प्रयोग हे चुकीचे आहेत याचा अपप्रचार सुरू केला आणि मतदार दुरावत गेला.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या संकल्पनेतून "आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या" या परिसंवाद मेळाव्याचे आयोजन केले असून फुले आंबेडकरी विद्वत सभेचे मा.भास्कर भोजने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य महासचिव तथा जिल्हा प्रभारी प्रा. किसन चव्हाण, तक्रार निवारण समितीचे प्रमुख प्रा. विष्णू जाधव यांच्यासह आजीमाजी जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी, कार्यकर्ते निवृत्त कर्मचारी अधिकारी हे उपस्थित राहणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये राहणाऱ्या जनतेस वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी असे आवाहन केले आहे की परिसंवाद मेळाव्यास प्रचंड संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे दिनांक ०८.०६.२०२५ रोजी ठीक १ वाजता उपस्थित राहावे असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# नारायणगडावर ज्येष्ठ शुद्ध एकादशीला भाविकांची गर्दी

**शिरूर । शंकर भालेकर**

धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गडावर आज ज्येष्ठ शुद्ध एकादशीच्या निमित्ताने पंचक्रोशीतील लाखो भाविक-भक्तांनी वारी करून श्री. नगद नारायण महाराजांचे दर्शन घेतले आहे. एकीकडे शेती कामाची धामधूम सुरू चालू असताना ही शेतातील कामे बाजूला सारून भाविक -भक्तांनी श्री विठ्ठल रुक्मिणी व श्री नगदनारायणाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या यामुळे आज दिवसभर नारायणगडावर भाविक भक्तांची मांदियाळी पाहायला मिळत होती.

महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री.क्षेत्र नारायण गडावर शुद्ध एकादशीच्या निमित्ताने भव्य स्वरूपात वारी भरत असून या ठिकाणी गडावरती लाखो भाविक भक्त येऊन श्री नगद नारायण महाराज यांच्या समाधीसमोर नतमस्तक होऊन साकडे घालत असतात.या प्रमाणेच शनिवार दि. ७ जून रोजी ज्येष्ठ शुद्ध एकादशीच्या निमित्ताने गडावरती भाविक -भक्तांचा मोठा ओघ



आला होता. प्रति मासिक वारी प्रमाणे याही वारीला पंचक्रोशीतील नव्हे तर जिल्हाभरातील भाविकांनी अगदी पहाटेपासूनच गडावर मोठी गर्दी केली होती. गडावर येणाऱ्या चारही रस्त्याने आज दिवसभर वाहनाची वर्दळ दिसून येत होती. श्री नगदनारायणाचे दर्शन घेऊन आज लाख खूप भाविक-भक्त आज आनंदाने गडावरती वावरताना दिसत होती. एकीकडे शेती कामाची धामधुम शेतकऱ्यांनी शेतातील कामे थांबून आज गडाची वारी करून आपली श्रद्धा व्यक्त केली होती. आषाढी एकादशीच्या निमित्ताने भाविकांना पंढरीकडे जाण्याचे आता वेध लागले आहेत. श्री.क्षेत्र नारायण गडावरून पंढरीकडे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी भव्य पायी दिंडी सोहळा निघणार आहे. त्याचे नियोजन व सोहळ्यामध्ये सहभागी भाविकांना करण्यासाठी आज रात्री गडावरती चक्री कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तनाच्या माध्यमातून गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी पंचक्रोशीतील भाविक -भक्तांना पायी दिंडी सोहळ्याचे नियोजन सांगून या सोहळ्याच्या पंढरीला जाण्यासाठी भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे अवाहनही केले आहे.

# स्टाफ नर्स नियुक्ती घोटाळा प्रकरणी सरकारने संबंधितांवर कठोर कार्यवाही करावी - डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यात सर्वत्र गाजत असलेल्या सरकारी स्टाफ नर्स नियुक्ती प्रकरणी झालेल्या घोटाळ्यासंदर्भात आणि भ्रष्टाचारा संदर्भात राज्य सरकारने त्वरित एसआयटी चौकशी करून संबंधित दोषींवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे शासनाला केली आहे.

याप्रकरणी डॉ.इंगोले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे की, राज्यात अपात्र उमेदवारांना लाच घेऊन अपुरे कागदपत्रे असताना जे पात्र उमेदवार नाहीत. त्यांना वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत कागदपत्रे पडताळणीसाठी मुंबईला बोलवून त्यांचा अर्थपूर्णरीत्या प्राधान्यक्रम भरून घेतलेला आहे व पात्र उमेदवारांना कसलीही कल्पना न देता अवैधरित्या या अपात्र उमेदवारांच्या नियुक्त्या केल्या गेलेल्या आहेत. या नियुक्त्यांचा दर जवळपास २० ते ३० लाख रूपये ठरलेला आहे व अनेक अपात्र उमेदवारांनी ही रक्कम संबंधित आरोपींना दिलेली आहे. अपात्र असलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्याला मान्यता देण्यासाठी डीएमईआर ऑफिसच्या बाजूला असलेल्या



पडताळणी कार्यालयाने सहा लाखांची रक्कम घेतलेली आहे असे अनेक उमेदवारांनी नांव न सांगण्याच्या अटीवर सांगितले आहे. त्यामुळे हा भ्रष्टाचार कोट्यावधी रूपयांचा असल्याची शंका आहे. ही प्रक्रिया पात्र उमेदवारांवर अन्यायकारक आहे व त्यांच्यावर अन्याय करणारी आहे. त्यामुळे या सबंध भरती प्रक्रियेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणी तात्काळ लक्ष घालून स्टाफ नर्स नियुक्ती घोटाळा प्रकरणी एसआयटी चौकशी करून संबंधित गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कार्यवाही करून भविष्यामध्ये असे प्रकार घडू नयेत यासाठी काळजी घ्यावी अशी मागणी अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे सरकारला केली आहे. याप्रकरणी शासनाने पारदर्शक पद्धतीने कार्यवाही न केल्यास अन्यायग्रस्त, पात्र डावललेल्या उमेदवारांच्या वतीने संघर्ष समिती स्थापन करून राज्यभरात तीव्र आंदोलन करण्यात येईल असेही डॉ.राजेश इंगोले यांनी शासनाला कळविले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त प्रा.लक्ष्मण हाके यांच्या व्याख्यानासह जयंती साजरी

घाटनांदुर । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० वी जयंतीनिमित्त दि २ जून सोमवार रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त २ जून रोजी सकाळी ११ वा. ओबीसींचा मोरक्या प्रा. लक्ष्मण हाके सर यांच्यासह भव्य दिव्य रॅलीचे आयोजन महात्मा बसवेश्वर चौक घाटनांदुर (महादेव पट्टी) ते सोमेश्वर मंदिर या ठिकाणी करण्यात आले. व नंतर



१२वाजता ओबीसीचा मोरक्या म्हणून ज्यांची ओळख आहे ते प्रा लक्ष्मण हाके सर यांच्यासह मान्यवरांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते व सायंकाळी पाच वाजता पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची शोभयात्रा मोठ्या उत्साहात करण्यात आली पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या या शोभयात्रेमध्ये धनगरी पारंपारिक असलेले इरकरी, वारू, हलगी पथक, घोडे,व ◀◀ पान ३ वर

# वडवणी येथे स्थानिक गुन्हे शाखेचा गुटखा गोडाऊनवर छापा, चार लाख पन्नास हजार रुपयांचा गुटखा जप्त

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करण्यासाठी अवैध धंद्ये करणारांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत.

त्यावरुन दिनांक ०६/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे वडवणी



हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, ईसम नामे अरविंद सुग्रिव म्हस्के हा त्याने किरायाने घेतलेल्या आनंद किराणा स्टोअर्स दुकानात मोठया प्रमाणात अवैद्यरित्या गुटख्याची साठवणुक करुन ठेवला आहे. यावरुन सदर ठिकाणी दोन पंचाना पाचारण करुन पोलीस स्टाफसह पोलीस उपनिरीक्षक विघ्ने यांचे टीम ने वसंतराव चौकातील आनंद किराणा स्टोअर्स् वर अचानक छापा टाकला असता ईसम नामे अरविंद सुग्रिव म्हस्के हा दुकानात हजर मिळुन आला. त्याचे दुकानाच्या झडतीमध्ये त्याने स्वत:चे फायद्यासाठी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत स्वादिष्ठ पान मसाला, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ वर बंदी असतांना देखील विनापरवाना, बेकायदेशीररित्या ◀◀ पान ३ वर

# पुष्पलता बाबासाहेब घोडके यांचे वृद्धापकाळाने निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील रयत शिक्षण संस्था सेवानिवृत्त शिक्षक श्री.बाबासाहेब घोडके यांच्या पत्नी पुष्पलता घोडके व आदर्श शिक्षक श्री.वैभवकुमार घोडके यांच्या आई या गेल्या काही... दिवसांपासून त्या अल्पशा आजाराने रुग्णालयात उपचार घेत होत्या उपचार चालू



असताना त्यांचे दु:खत निधन झाले त्यांच्यावर सुलेमान देवळा येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पती,एक मुलगी,दोन मुले ,दोन सुना अन्? नातवंडे असा परिवार आहे त्यांच्या निधनाने पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त होतं आहे.

# पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेचा व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा -जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

श्री क्षेत्र चाकरवाडी येथील वैकुंठवासी संत माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ८ जून पासून सुरू होणाऱ्या पुज्य पंडित प्रदीप मिश्राजी यांच्या श्रीमुखातून महाशिवपुराण कथा ऐकण्याचे अभूतपूर्व असे आयोजन करण्यात आले आहे. ही कथा ऐकण्यासाठी भाविक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणार आहेत. तसेच माजलगाव बस स्थानक येथून ८ जून ते १४ जून पर्यंत सकाळी ७:३० ते ९ वाजेपर्यंत तसेच परत येताना



सुद्धा बसची सेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे. माजलगाव तालुक्यास या अभूतपूर्व शिवपुराण कथेच्या कार्यक्रमाची सेवा करण्याचा मान ९ जून सोमवार रोजी मिळालेली आहे, यावेळी दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे . माजलगाव विधानसभा मतदारसंघातील भाविकांनी या महाशिवपुराण कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते तथा छत्रपती सह. साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी केले आहे.

# वडवणी पोलिसांच्या सतर्कतेमुळे सुधारगृहातून पळून गेलेल्या दोन अल्पवयीन मुली ताब्यात घेण्यात यश

बीड । प्रतिनिधी

पोलीस ठाणे वडवणी येथील २० दिवसापूर्वी व पोलीस ठाणे दिंद्रुड येथील चार ते पाच महिन्यापूर्वी ०२ अपहरणाचे गुन्हे दाखल होते या गुन्ह्यामध्ये पीडिता असलेल्या ०२ अल्पवयीन मुली सरकारी महिला स्वाधार गृह बीड येथे दाखल होत्या. दिनांक ०७ जून २०२५ रोजी सकाळी या दोन्ही अल्पवयीन मुली महिला स्वाधार गृहातून पळून गेल्या.

याची माहिती वडवणीच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना मिळाली, अशा मुली शहराबाहेर गेल्या तर त्यांचा कुणीही गैरफायदा घेऊ शकतो याचे गांभीर्य ओळखून त्याचे शोधाबाबत अधिक तपास केला असता, या दोन्ही मुली विठ्ठल रखुमाई मंदिर, ग्रामसेवक कॉलनी बीड,परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून वडवणीचे दुय्यम अधिकारी चव्हाण यांना सदर ठिकाणी तात्काळ पाठवून त्या दोन्ही अल्पवयीन मुलींना थांबवून ठेवले, व शिवाजीनगर पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक पवार यांना फोन करून माहिती देत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथील स्टाफ बोलावला. दोन्ही मुली पुन्हा स्वाधारगृहात दाखल करण्यासाठी शिवाजीनगर महिला पोलिसांचे ताब्यात दिल्या.त्यानंतर त्या महिला स्वाधारगृहाचे यांचे मार्फतिने अध्यक्ष बालकल्याण समिती यांच्याकडे हजर करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण व शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे १६६४ रविंद्र गोवर्धन आघाव १०३४ शीतल केशव जोगदंड २०७७ बाळु बाजीराव राहाडे २७३ नवनाथ बंडू डाके यांनी केली आहे.

# वहाली जलजीवन योजनेतील अपूर्ण कामांची चौकशी करावी शरद पवार यांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वहाली गावातील जलजीवन योजनेचे काम अद्यापही अपूर्ण असून, या संदर्भात सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांनी केली आहे.वहाली गावातील जलजीवन योजनेचे काम अनेक वर्षांपासून अर्धवट असल्यामुळे याबाबत वेळोवेळी तक्रार करूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने वहाली जलजीवन योजनेसाठी ‘‘सरकारने लाखो रुपयांचा निधी मंजूर करूनही पाण्याचा थेंबही गावकऱ्यांच्या घरी पोहोचत नाही, हे अत्यंत दु:खद आहे. यामध्ये संबंधित कंत्राटदार, अभियंते आणि अधिकाऱ्यांची भूमिका तपासून योग्य ती कारवाई झाली पाहिजे,‘‘ अशी मागणी शरद पवार यांनी केली.या प्रकरणी बीड जिल्हा परिषद प्रशासनाने याची तत्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी व वहाली गावकऱ्यांना लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अजित पवार गटाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते शरद पवार यांनी केली आहे.

# प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मान्यवरांचे व्याख्यान



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवार, दिनांक ६ जुन रोजी शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे व्हिडिओद्वारे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते बिपिनदादा क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख वक्ते तथा सामाजिक कार्यकर्ते गुरूगोविंद सोन्नर यांनी स्वदेशी विचारांचा प्रसार या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची संकल्पना महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ना.मंगल प्रभातजी लोढा मंत्री यांची होती. उद्घाटनानंतर कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा (भा.प्र.से.) यांनी ऑनलाईन व्हिडिओद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरूवात कौशल्य गीताने झाली. तर प्रास्ताविक शिल्प निदेशक रामदास वैरागे यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बिपिनदादा ◀◀ पान ३ वर

# प्रा.हनुमंत देशमुख यांनी अत्यंत तळमळीने शिक्षणक्षेत्रात सेवा देण्याचे काम केले -डॉ.कल्पना चौसाळकर

आंबेजोगाई । प्रतिनिधी

खोलेश्वर महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयाचे प्रा.हनुमंत देशमुख यांनी अत्यंत तळमळीने शिक्षण क्षेत्रात सेवा देण्याचे काम केले. वसंतराव गुरुजींच्या सहवासातून संस्काराची मूल्य जोपासून समर्पण ,त्याग आणि सहनशीलता हे गुण आणि विचारकुलाचा वारसा घेऊन अविरतपणे विद्यार्थी घडवण्याचे कार्य केले...असे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ.कल्पनाताई



चौसाळकर यांनी केले .. येथील खोलेश्वर महाविद्यालयातील प्रा.हनुमंत देशमुख यांच्या सेवा गौरव कार्यक्रमाप्रसंगी त्या अध्यक्षस्थानावरुन म्हणून बोलत होत्या.

यावेळी मंचावर खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण दादा कोदरकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.अप्पाराव यादव, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, सीबीसी स्कूलचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव चौसाळकर, सत्कार मूर्ती प्रा.हनुमंत देशमुख आणि सौ.राजश्रीताई देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक फुलारी आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .यावेळी प्रास्ताविकामध्ये प्राचार्य दीपक फुलारी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना देशमुख सरांचे महाविद्यालय कामकाजामध्ये खूप योगदान आहे . त्यांच्यावर दिलेली जबाबदारी त्यांनी अत्यंत सक्षम पणे सांभाळली. तसेच महात्मा गांधी विचार संस्कार परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून परीक्षा पद्धती तसेच स्पर्धात्मक ज्ञानदानाचे

# कत्तलखान्याकडे जाणारे सतरा गोवंशीय प्राणी पोलिसांच्या ताब्यात



बीड । प्रतिनिधी

बीड पोलिसांनी छापा टाकून १७ गोवंशीय प्राणी ताब्यात घेतले असून यांची किंमत जवळपास अडीच लाख रुपये आहे .हे घेऊन जाणारे तिघेजण फरार झाले आहेत.

दिनांक ७/६/२५ रोजी पोलिस स्टेशन पेठ बीड पोलिस निरीक्षक अशोक मुदिराज, प्रीतमकुमार पुजारी ,/नितीश माने, चालक इम्रान सय्यद यांना मिळालेल्या गोपनीय माहिती वरून १७ गोवंशीय प्राण्यांना कत्तल करणे चे उद्देशाने मोहम्मदिया कॉलनी जवळ प्लॉट वर दोरीने बाधून ठेवलेले गोवंश मिळून आले. त्या ठिकाणी छापा टाकून सर्व गोवंश ताब्यात घेतले. आरोपी गणी बबलू कुरेशी .

रा. कुरेशी मोहल्ला व इतर दोन अनोळखी घटना ठिकाणावरून ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सभा गजबजतात, पण मतं मिळत नाहीत; शरद पवारांचा राज ठाकरेंवर थेट निशाणा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार का? याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. मात्र, या संभाव्य एकीबाबत कोणताही ठोस निर्णय अद्याप झाला नसल्याचे स्पष्ट आहे. अशा स्थितीत, एकीकडे ठाकरे गटात नेत्यांची सतत 'इनकमिंग' सुरू असून दुसरीकडे मनसेमधून नेत्यांची गळती वाढताना दिसत आहे.



याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी थेट राज ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. पुणे दौऱ्यावर असताना पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी राज ठाकरे यांच्या सभांबाबत खळबळजनक निरीक्षण मांडले.

राज ठाकरे यांच्या सभा आकर्षक आणि गजबजलेल्या असतात, त्यांना चांगली गर्दी मिळते, मात्र त्या सभा मतांमध्ये रूपांतरित होत नाहीत. माझा आतापर्यंतचा अनुभव असाच आहे, असे परखड मत शरद पवार यांनी यावेळी मांडले.

त्याचवेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या सभांवर विश्वास व्यक्त करत सांगितले की, उद्धव ठाकरे यांच्या सभांमुळे मतांमध्ये निश्चित परिवर्तन घडताना दिसतं.

पुढे बोलताना शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीने एकत्र लढाव्यात, अशी इच्छा व्यक्त केली. याउलट, महायुतीचे पक्ष या निवडणुका एकत्र लढवतील, असं चित्र सध्या तरी दिसत नाही, असा सूचक टोला त्यांनी विरोधकांना लगावला.

दरम्यान, मनसेसाठी आणखी एक धक्का बसला आहे. पक्षाचे एकमेव माजी नगरसेवक संजय तुर्डे यांनी मनसेची साथ सोडत शिंदे गटात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राज ठाकरे यांना संघटनात्मकदृष्ट्या मोठा झटका बसला आहे. तुर्डे यांच्या प्रवेशामुळे शिंदे गट अधिक बळकट होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## राजकारणात संवाद गरजेचाच, प्रफुल्ल पटेलांचे मार्गदर्शन घेते, तटकरेंशीही संवाद होईल-खासदार सुप्रिया सुळे

**पुणे । प्रतिनिधी**

'राजकारणात संवाद असलाच पाहीजे. प्रफुल्ल पटेल यांना संसदेतील कामाचा मोठा अनुभव आहे. त्यामुळे धोरणांबाबत अनेकदा मी स्वतः पटेल यांचे मार्गदर्शन घेते. इतकेच नव्हे, तर आनंद शर्मा, मनीष तिवारी, मुरलीधरन, अनुराग ठाकूर अशा वेगवेगळ्या पक्षातील आम्ही सर्वजण टिम म्हणून काम करत असतो. तटकरे व मी कोणत्याही समितीत एकत्र नसल्याने आमची गाठभेट होत नाही. पण, संसद सुरू झाल्यानंतर त्यांच्याशीही संवाद होईल.' अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी पटेल व तटकरे यांची पाठराखण केली.



खासदार सुळे शनिवारी पुणे दौऱ्यावर होत्या, त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'राष्ट्रवादीसंदर्भातील प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. पक्ष स्थापनेला २६ वर्ष झाली. हा प्रवास उभ्या महाराष्ट्रानेच नव्हे, तर देशाने पाहिला आहे.'

असे सांगून सुळे म्हणाल्या, 'पक्ष संघटना ही ठराविक व्यक्तीमुळे चालत नाही. नेत्यांमुळे संघटना चालते, पण हातात झेंडा घेऊन शेवटी थांबलेला कार्यकर्ता देखील तितकाच महत्त्वाचा व पक्षाचा केंद्रबिंदू असतो. आपण लोकांच्या सेवेसाठी निवडून आलेलो आहोत, त्यामुळे कामात सातत्य ठेवण्याचे काम मी करते. सुळे म्हणाल्या, 'स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लवकर होणे गरजेचे आहे. न्यायालयाने निवडणुकीबाबत आदेशही दिलेले आहेत. निवडणुकीत जे निवडून येतील, त्यांनी कामाला लागावे, अशी आमची अपेक्षा आहे. आम्ही महाविकास आघाडी म्हणूनच निवडणूक लढणार आहोत.

महापालिका, जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते. कार्यकर्त्याला संधी द्यावी, असे प्रत्येक पक्षाला वाटते. निवडणुकीबाबत स्थानिक नेते निर्णय घेतील. आम्ही त्यांच्याशी चर्चा करून मार्ग काढू.'

'महापालिकेतील महिला अधिकाऱ्यासंबंधीच्या तक्रारीची मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन चौकशी करावी. त्यासंबंधीचा अहवाल सादर करावा असे सांगून सुळे म्हणाल्या, 'महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारात वाढ होते हि धक्कादायक बाब आहे. एकीकडे एआयची चर्चा करायची आणि दुसरीकडे हुंडाबळीच्या घटना पहायच्या. त्यामुळेच आम्ही राज्यभर हुंडाविरोधी जागर करणार आहोत. महिलांना न्याय मिळाला पाहीजे.'

## पोलिसावर खंडणीचा गुन्हा दाखल; बॅगेत हुक्का आढळल्यानंतर दिली होती कारवाईची धमकी

**पुणे । प्रतिनिधी**




कोंढवा पोलिस ठाण्यातील एका पोलिसावर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या बॅगेत हुक्का स्पॉट आढळल्यानंतर, कारवाई करण्याच्या धमकीने या पोलीस कर्मचाऱ्याने २८ हजार रुपयांची खंडणी उकळली आहे. ही घटना बोपदेव घाटात घडली.

पोलीस शिपाई विक्रम लक्ष्मण वडतीले आणि त्याचा साथीदार केदार जाधव या दोघांविरुध्द कोंढवा पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी अदनान रजा (१९, रा.चेन्नई) याने तक्रार दिली आहे.

फिर्यादी हा त्याच्या दोन मित्रांसह बोपदेव घाटात गुरुवारी सकाळी फिरायला गेला होता. तेव्हा तेथे कोंढवा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस शिपाई विक्रम आणि त्याचा मित्र केदार हे दोघे दाखल झाले. त्या दोघांनी फिर्यादी आणि त्याच्या मित्रांची सॅक तपासली. यातील एका सॅकमध्ये हुक्क्याचे सामान सापडले.

याप्रकरणी गुन्हा दाखल करुन अटक करण्याची भिती दाखवत ३० हजाराची मागणी वडतीले याने केली. मात्र तडजोडीअंती फिर्यादीच्या मित्राने केदार जाधव याच्या गुगल पेवर २८ हजार वर्ग केले. याप्रकरणी तक्रार दाखल होताच वडतीले याला निलंबीत करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक नवनाथ जाधव करत आहेत.

## फक्त १० मिनिटात आयटी पार्कचा वॉटर पार्क

### पिंपरी चिंचवड शहरात पावसाची जोरदार बॅटींग; हिंजवडी परिसरात पाणीच पाणी

**पिंपरी । प्रतिनिधी**

राज्याच्या काही भागामध्ये विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली आहे. पिंपरी चिंचवड शहरात आज सकाळी आलेल्या दमदार पावसामुळे आयटी पार्क हिंजवडी (कळपक्षशुरवळ क्शर्रीू ठरळप) हा परिसर वॉटर पार्क हिंजवडी झाला आहे. फक्त काही मिनिटे आलेल्या दमदार पावसामुळे हिंजवडी (कळपक्षशुरवळ क्शर्रीू ठरळप)परिसरातील रस्ते पाण्याने तुंबले आहेत. तर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने दुचाकी वाहन देखील वाहून गेले आहेत. पावसाळ्यापूर्वी हिंजवडी परिसरामध्ये ड्रेनेज लाईन आणि नालेसफाई योग्य पद्धतीने न झाल्याने आज आयटी पार्क हिंजवडी वाटर पार्क हिंजवडी झाल्याची वेळ ओढवली आहे. टेल्को रोड, लांडेवाडी, हिंजवडी या परिसरांमध्ये



मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं असल्याने नागरिकांची तारांबळ उडाली.पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील लांडेवाडी आणि भोसरी एमआयडीसी हद्दीत देखील काही मिनीटांच्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. सकाळी १० वाजता काही मिनिटांसाठी झालेल्या पावसाने प्रशासनाची पोलखोल झाल्याचं समोर आलं आहे. दोन्ही ठिकाणी नाल्यांमुळे ही अवस्था निर्माण झाली आहे. पावसाळी नियोजनाच्या नावाखाली बैठका आणि त्याच्या प्रेसनोट एवढंच सुरू असल्याच्या चर्चा आहे. नागरिकांनी प्रशासनाच्या कारभारावरती संताप व्यक्त केला आहे.

सुप्रिया सुळे यांची पोस्ट

हिंजवडी फेज २ परिसरामध्ये काही मिनीटामध्ये पावसामुळे जागोजागी पाणी साचलं. प्रशासनाच्या या कारभारावरची खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील संताप व्यक्त केला आहे, त्यांनी सोशल मिडियावरती पावसाचे, पाणी साचल्याचे व्हिडीओ टाकत पोस्ट लिहली आहे. हिंजवडी फेज २ परिसरातील रायन इंटरनॅशनल स्कूलजवळ आणि इतर अनेक भागांत जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे. या भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था आहे की नाही अशी शंका येते. येथील नालेसफाईसारखी कामे वेळेत होण्याची गरज आहे. परंतु ही कामे वेळेत झालेली दिसत नाहीत. एमआयडीसीने याबाबत तातडीने लक्ष घालून येथे भविष्यात पाणी साठून नागरीकांना त्याचा त्रास होऊ नये यासाठी दिर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे.

हिंजवडी फेज २ परिसरातील रायन इंटरनॅशनल स्कूलजवळ आणि इतर अनेक भागांत जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे. या भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था आहे की नाही अशी शंका येते. येथील नालेसफाईसारखी कामे वेळेत होण्याची गरज आहे. परंतु ही कामे वेळेत झालेली दिसत नाहीत

## झिंगाट कारचालकाची गाडी घुसली थेट दुकानात; पाच ते सहा नागरिक सुदैवाने बचावले



**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदी - वडगाव रस्त्यावर भरधाव असलेली कार रस्ता क्रॉस करून थेट दुकानात घुसल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. ६) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली. यात सुदैवाने जीवितहानी झाली नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. वडगाव रस्त्यावर सायंकाळी सहाच्या सुमारास एक भरधाव कार आळंदीकडून वडगावकडे चालली होती. गाडीचा वेग अधिक असल्याने समोर आलेल्या वाहनांच्या नादात कारचालकाने कट मारला; मात्र वेगावर नियंत्रण नसल्याने गाडी थेट रस्ता ओलांडून रस्त्यालगत असलेल्या दुकानात घुसली. गाडी अंगावर आलेली पाहून येथे उभे असलेले नागरिक बाजूला झाले. कारचा चालक मद्यधुंद असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले असून या घटनेचा तपास सुरू आहे.

दरम्यान पुण्यात अशाच भरधाव कारने स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उडविल्याची घटना उघडकीस आली होती. त्यावरून रस्त्यावरील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

## वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात नीलेश चव्हाणची रवानगी येरवडा कारागृहात

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात गुन्हा दाखल असलेला आरोपी नीलेश चव्हाण याची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. वैष्णवी यांची सास लता, नणंद करिष्मा आणि पती शशांक यांचे मोबाईल नीलेश चव्हाणकडून जप्त करण्यात आले आहेत. नीलेश चव्हाण व इतर आरोपींमध्ये मोबाईलच्या माध्यमातून झालेले संभाषण व मेसेज तपास जप्त करण्यात आले आहे.



वैष्णवी यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेला सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), दिर सुशील राजेंद्र हगवणे (वय २७), पती शशांक राजेंद्र हगवणे (वय २७), सासू लता राजेंद्र हगवणे (वय ५४), नणंद करिष्मा राजेंद्र हगवणे (वय ३१) यांना न्यायालयाने यापूर्वीच न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलिस कोठडीची मुदत संपत असल्याने नीलेश याला शनिवारी (ता. ७) न्यायालयात हजर करण्यात आले होते.

चव्हाणने बाळाशी कोणती गैरवर्तणूक केली आहे. नीलेश आणि इतर आरोपींमध्ये नेमके काय संभाषण झाले? चव्हाण आणि हगवणे कुटुंबातील सदस्य यांच्यात आर्थिक व्यवहार झाले आहेत. त्यातून हा गुन्हा करण्यात आला आहे का? याचा तपास करत आहेत, अशी माहिती पोलिसांनी न्यायालयास दिली. आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात यावी, असा अहवाल पोलिसांनी न्यायालयात सादर केला. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेल्या वाहनांची नोंदणी प्रत प्राप्त करण्यात आली आहे. शशांक आणि वैष्णवी हिचे मोबाईलमधील व्हॉटसअप चॅट स्क्रिनशॉट पोलिसांनी जप्त केले आहे. बचाव पक्षाकडून ड. स्वानंद गोविंदवार यांनी युक्तिवाद केला. मुळ फिर्यादी यांच्यावतीने ड. शिवम निंबाळकर कामकाज पाहात आहेत.

## लोहगड किल्ल्याचा भाग कोसळला; सुदैवाने जीवितहानी नाही

**पवनानगर । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील लोहगड किल्ल्याचा भाजे गावाच्या बाजूकडील काही भाग शनिवारी (दि. ७) सायंकाळच्या सुमारास कोसळला. सुदैवाने ह्या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. परंतु किल्ल्याचा भाग कोसळल्याने शिवप्रेमींमध्ये दुःखाचे वातावरण आहे.



लोहगडाच्या पायथ्याशी पुर्वेकडील बाजूला लोहगड गाव असून किल्ल्याला लागूनच गावातील वस्ती आहे. ह्या वस्तीची लोकसंख्या ६५० पेक्षा अधिक आहे. तर उत्तर बाजूला भाजे गाव आहे. तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत असून या पावसाच्या माऱ्याने गडाच्या उत्तर बाजुचा काही भाग शनिवारी साडेपाचच्या सुमारास कोसळला.

दरड कोसळल्यासारखा आवाज झाल्याने भयभीत झालेल्या नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन व महसूल विभागाला कळविले. दरड छोटी असल्याने कुठलीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही. परंतु स्थानिकांनी अलर्ट राहणे गरजेचे असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. तसेच याठिकाणी ग्रामपंचायत प्रशासन, पोलीस पाटील, ग्रामसेवक यांनीही अलर्ट राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## शरद बँकेकडून क्यूआर कोड प्रणालीचा शुभारंभ; 'नोटवर नव्हे, बोटावर पेमेंट' या स्लोगनचे अनावरण

**मंचर । प्रतिनिधी**

शरद बँकेने ५२ वर्षाच्या इतिहासात प्रथमता निव्वळ एन पी ए. प्रमाण शून्य टक्के ठेवले आहे. एकूण एक हजार ८६६ कोटी १५ लाख रुपये ठेवीचा टप्पा ओलांडला आहे.येत्या दोन वर्षात पाच हजार कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण करण्याचे उदिष्ट आहे. बँकिंग क्षेत्रात भारतात शरद बँकेचा ४० वा क्रमांक आला असून बँकेने क्यूआर कोड प्रणाली लागू केल्यामुळे घर बसल्या ग्राहकांना डिजिटल पद्धतीने आर्थिक व्यवहार करता येईल .असे शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा यांनी सांगितले.




अवसरी खुर्द (ता.आंबेगाव) येथे पराग मिल्कच्या सभागृहात शुक्रवारी(ता.६) शरद बँकेच्या क्युर कोड प्रणालीचे व आता ' नोटवर ' नाही , ' बोटावर ' पेमेंट ! या स्लोगनचे अनावरण शहा व बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या हस्ते झाले.यावेळी संचालक दत्तात्रय थोरात, शिवाजीराव लोंढे, अशोक आदक, किसनराव सैद, सुदाम काळे, जयसिंग थोरात, अजय घुले, संतोष धुमाळ, प्रदीप आमुंडकर, दौलत लोखंडे, सुषमा शिंदे, रूपाली झोडगे, अँड संजय आर्वीकर,विजयकुमार शिंदे ,निवृत्ती अभंग, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख ग्राहक व सभासद उपस्थित होते. उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील म्हणाले आण्णासाहेब पाटील महामंडळामार्फत १५ लाख रुपये पर्यंतचा कर्ज पुरवठा शून्य व्याजदराने केला जातो.आर्थिक वर्षात १६२ जणांना व्यवसाय उद्योग उभारणीसाठी १२९ कोटी ९४ लाख रुपये कर्ज वाटप केले आहे. निव्वळ नफा रु.१७ कोटी १८ लाख रुपये झाला आहे.देशमुख यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी भोर,अजित देवकर ,अभय आवटे पोपटराव पोखरकर यांनी व्यवस्था पाहिली

# महिलांमधील वाद विकोपाला!

## चुलत्याचा खून, तर चुलत भावावर प्राणघातक हल्ला; पुतण्यास अटक

**चाकण । प्रतिनिधी**

महिलांमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे पर्यवसन तुंबळ हाणामारीमध्ये झाले. यामध्ये पुतण्याने चुलत्याच्या छातीत लोखंडी गज घुसवून त्यांचा खून केला, तर चुलत भावाला लोखंडी गजाने गंभीर मारहाण केल्याची घटना बहुळ (ता. खेड) येथे शुक्रवारी (दि. ६) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.

दत्तात्रय पानसरे (वय ६२, रा. चांदणी चौक, पानसरेवस्ती, बहुळ, ता. खेड) असे खून झालेल्या चुलत्याचे नाव असून, तुकाराम दत्तात्रय पानसरे (वय ३८) हे या घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर चाकण येथील एका



खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. (डरींशींीं झींपश छशु)

तुकाराम पानसरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचा चुलत भाऊ दशरथ गुलाब पानसरे (रा. चांदणी चौक, पानसरेवस्ती, बहुळ, ता. खेड) याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास बहुळ गावातील चांदणी चौक, पानसरेवस्ती येथे फिर्यादी तुकाराम यांची पत्नी व आरोपी दशरथ याची पत्नी यांच्यात काही किरकोळ कारणावरून भांडण झाले.

सणसवाडी येथे कंपनीत कामावर गेलेला आरोपी दशरथ याला त्याच्या पत्नीने फोन करून भांडणाची माहिती देत घरी बोलावून घेतले. दुचाकीवरून घरी आलेल्या दशरथ पानसरेने कसलाही विचार न करता हातात लोखंडी गज घेतला. त्यानंतर चुलत भाऊ तुकाराम यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने पोटात लोखंडी गज घुसवण्याचा प्रयत्न केला. या वेळी फिर्यादी तुकाराम यांनी स्वतःचा डावा हात पुढे केला असता डाव्या हातामध्ये गज आरपार घुसून ते जखमी झाले. या वेळी तत्काळ फिर्यादी तुकाराम यांचे वडील दत्तात्रय पानसरे हे आरोपी दशरथ यास पकडण्यासाठी गेले असता दशरथने आपले चुलते दत्तात्रय पानसरे यांच्या छातीत मधोमध लोखंडी गज घुसवला. जखमी अवस्थेत फिर्यादी तुकाराम आणि त्यांच्या वडिलांना चाकण येथील रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, छातीत मधोमध गज घुसवलेला असल्याने दत्तात्रय पानसरे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी दशरथ व त्याची पत्नी यांना ताब्यात घेतले आहे.

## श्री खंडोबा मंदिर गडावर राजमाता अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त 'मल्हार याग', मेघडंबरीचे लोकार्पण

**जेजुरी । प्रतिनिधी**

जेष्ठ शुक्ल द्वादशी, शनिवार (दि. ०७) रोजी श्री खंडोबा मंदिर गडावर हिंदू धर्म रक्षक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी (३०० व्या) जयंती वर्षानिमित्त श्री मार्तंड देवसंस्थानतर्फे ३०० जोडप्यांच्या शुभहस्ते भव्य मल्हार यागाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील भाविक-भक्तांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

या सोहळ्याच्या वेळी महाराष्ट्राचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, पुरंदरचे आमदार विजय शिवतारे आणि जतचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते महाआरती संपन्न झाली. यावेळी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकाते, डॉ. राजेंद्र खेडेकर, मंगेश घोणे, ड. विश्वास पानसे, अनिल सौंदडे आणि पोपट खोमणे यांनी सर्व यजमान आणि मान्यवरांचा सत्कार केला.



सोहळ्याचे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे श्री खंडोबा मंदिर पायरी मार्गावरील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला सजवण्यात आलेली भव्य मेघडंबरी. या मेघडंबरीचे लोकार्पण मंत्री जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त मंडळ, ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, पुजारी वर्ग आणि सेवेकरी वर्ग यांनी केले. हा सोहळा भाविकांमध्ये श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण करणारा ठरला. राजमाता अहिल्यादेवी यांच्या कार्याचा गौरव करताना उपस्थितांनी त्यांच्या योगदानाला उजाळा दिला.